cmyk


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... ©email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२४८ | मंगळवार, दि.३१ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये


## संपादकीय

### टोल लुटारूंना चपराक!

टोल भरून हैराण झालेले वाहतूकदार, व्यापारी, नागरिक यांना दिलासा देणारा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. 'बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा' अर्थात बीओटी तत्त्वानुसार बांधण्यात आलेल्या रस्त्याचा टोल किती काळ वसूल व्हावा याबाबत दिशा देणारा हा निकाल आहे. महामार्ग बांधकामासाठी केलेला खर्च आणि त्यावरील नफा लक्षात घेऊन तो मिळाल्यानंतर करारात दाखवलेल्या कालमर्यादेचा विचार न करता टोल बंद झाला पाहिजे असे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत आणि उज्वल भुयान यांनी निकालात म्हटले आहे. सरकारी अधिकाऱ्यांची कार्यपद्धती आणि ते राबवत असलेल्या धोरणातून जनतेची पिळवणूक नव्हे तर सेवा झाली पाहिजे.

### राज्यातला पाऊस गेला आता थंडी वाढणार

पुणेः राज्यात पावसाचे वातावरण दूर झाले. त्यामुळे तापमानात चढ उतार दिसून येत आहेत. गेल्या आठवडाभरात ढगाळ वातावरण आणि पावसामुळे थंडी गायब झाली होती. उत्तर भारतातील राज्यांमध्येही बहुतांशी ठिकाणी थंडी कमी झाली. राज्यात पुढील काही दिवसांमध्ये पुन्हा थंडीला सुरुवात होईल, असा अंदाज हवामान विभागाने दिला. राजस्थान आणि परिसरावर चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. या परिसरापासून उत्तर गुजरातपर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्ट्याचीही निर्मिती झाली. पूर्वेकडील वाऱ्यांच्या प्रभावामुळे आग्नेय अरबी समुद्रापासून दक्षिण महाराष्ट्रापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. यामुळे सध्या उत्तर भारतातील राज्यांमध्ये थंडी कमी झालेली आहे.

# पीकविम्यातून २५०० गावे बाद

## गैरप्रकार टाळण्यासाठी कृषी विभागाची कारवाई

पुणे। प्रतिनिधी

बोगस पीक विम्याला आळा घालण्यासाठी कृषी विभागाने आता ॲक्शन मोडवर येत काम सुरु केले आहे. नुकतेच राज्यातील सव्वातीन लाख बोगस अर्ज रद्द केले आहेत. तर आता विमा पोर्टलवरील अंदाजे अडीच हजार गावांची नावे ब्लॉक करण्याची शिफारस करण्यात




आली आहे. या गावांचे संगणकीय सातबारा उतारे अस्तित्वात नाहीत. मात्र बनावट उताऱ्यांच्या आधारे कोट्यवधी रुपयांचे विमा प्रस्ताव दाखल केले जात होते. ही गावे ब्लॉक झाल्यानंतर अशा प्रकारांना आळा बसेल, असे कृषी विभागाचे म्हणने आहे.

परभणी जिल्ह्यातील काही गाव–तांड्यांवर याच पध्दतीने विमा भरण्यात आला आहे. त्याचा भांडाफोड विधानभवनात आमदार सुरेश धस यांनी केला. ज्या तांड्यांचे शेतीजमिन क्षेत्र ४०० हेक्टर आहे. त्या तांड्यांमध्ये ४ हजार हेक्टरपर्यंत विमा काढला होता. कारण महसूल विभागाकडे या गावांमधील सातबाराची नोंदच नाही. पण विमा पोर्टलवर त्या गावांची नोंद होती. म्हणजेच त्या गावात पीकविमा भरता येत होता. त्यामुळे बोगस सातबारा काढून विमा काढला होता. पण कृषी विभागाने हे विमा अर्ज रद्द केल्याची माहिती आहे. बोगस पीकविम्याचा प्रश्न थेट विधिमंडळात गाजला. त्यामुळे बोगस पीकविम्याविषयी ◀◀ पान २ वर

### आता पर्यंत सव्वातीन लाख अर्ज रद्द

२०२३ च्या खरिपात हे प्रमाण कमी होते. पण शासनाच्या लक्षात ही बाब आली नसल्याने अनेकांना विमा भरपाईदेखील मिळाल्याचे काही शेतकऱ्यांनी सांगितले. मागील हंगामात विमा भरपाई मिळाल्याने यंदा या गावांमध्ये विमा अर्ज भरण्याचे प्रमाण वाढले. या बोगस अर्जांची संख्या पाहून त्या गावांमधील शेतकरीही चक्रावून गेले आहेत. मात्र शासनाने त्यापैकी तब्बल सव्वातीन लाख अर्ज रद्द केले आहेत. आता ही गावे ब्लॉक केल्यास गैरप्रकारांना आळा बसण्यास मदत होणार आहे.

## शस्त्रांची गरज नसणाऱ्यांचे परवाने रद्द करणार – पोलिस अधिक्षक कॉवंत



बीड । प्रतिनिधी

जेवढ्या जणांना शस्त्र बाळगण्याबाबत परवानगी दिली आहे त्या सर्व फाईल्सची चौकशी सुरु आहे. शस्त्र प्रकरणात ज्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे त्यांच्यावर कारवाई सुरु आहे. याबाबत माझी जिल्हाधिकाऱ्यांसोबतही चर्चा झाली आहे. शस्त्रांची गरज कितपत आहे या अनुषंगाने शस्त्रांचा परवाना राहू द्यायचा की नाही, शस्त्राची खरेच गरज आहे की नाही, याचे ॲनेलिसिस सध्या सुरु आहे. ज्या लोकांना गरज नाही त्यांचे परवाना रद्द होणार असल्याची माहिती सोमवार दि. ३० डिसेंबर रोजी बीड जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवंत यांनी प्रसारमाध्यमांना दिली.

बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा सीआयडीकडून तपास सुरु आहे. आमदार सुरेश धस यांनी एसपी नवनीत कॉवत यांची भेट घेतली. यानंतर एसपी नवनीत कॉवंत यांनी माध्यमांना प्रतिक्रिया ◀◀ पान २ वर

### सीआयडीला सर्वतोपरी मदत

सध्या सीआयडीकडून तपास सुरु आहे. सीआयडीला बीड पोलिसांची जेव्हा आणि जशी मदत लागते तशी मदत पोलिसांकडून दिली जाते अशी प्रतिक्रिया जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिली.

# बीडनंतर बुलढाण्यात काळा आक्रोश...

## संतोष देशमुखांना न्याय द्या, धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्या ; मोर्चेकऱ्यांची एकमुखी मागणी

बुलढाणा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातल्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आली, या घटनेला आता वीस दिवस उलटून गेले आहेत. मात्र या प्रकरणातील काही आरोपी पकडण्यात पोलिसांना अद्यापही यश आलेले नाही. त्यामुळे वातावरण चांगलंचे तापले आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येतील आरोपींना अटक व्हावी या मागणीसाठी बीडमध्ये सर्वपक्षीयाच्या वतीने शनिवारी आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चानंतर आता बुलढाण्यातील सिंदखेड राजा येथे सकल मराठा समाजाच्या वतीने निषेध मोर्चा काढण्यात




आला.

या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने आंदोलक सहभागी झाले आहेत. महिलांची उपस्थिती देखील ◀◀ पान २ वर

### धनजंय मुंडे यांनी घेतली मुख्यमंत्री फडणवीसांची भेट; चर्चांना उधाण



मुंबईः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांचा रोड मॅप ठरविण्यासाठी सह्याद्री अतिथीगृहावर सोमवारी (दि.३०) बैठक बोलावली होती. यावेळी त्यांनी परिवहन, बंदर व नागरी विमान चालन, सांस्कृतिक कार्य, ग्रामविकास, अन्न व नागरी पुरवठा, वस्त्रोद्योग विभागाचा आढावा घेतला. दरम्यान, तत्पूर्वी अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली.

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात खंडणीचा गुन्हा दाखल झालेले आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असलेले वाल्मीक कराड यांच्यावर विविध स्तरातून आरोप होत आहेत. या पार्श्वभूमीवर बीडमध्ये सर्वपक्षीयांनी भव्य मोर्चा काढून मंत्री मुंडे आणि वाल्मीक कराड यांच्यावर हल्लाबोल केला होता. मंत्री मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती. त्यामुळे ◀◀ पान २ वर

### चौकशीनंतर महिलेचे बँक खाते गोठविले

केजः सीआयडीच्या तपास पथकाकडून केज पोलीस ठाण्यामध्ये सोमवारी (दि.३०) एका महिलेची कसून चौकशी करण्यात आली आहे. जवळपास दोन तास ही चौकशी सुरू होती. चौकशीनंतर या महिलेचे बँक खाते गोठविण्यात आले आहे. तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडातील तपासाबाबत सीआयडी आता ॲक्शन मोडमध्ये आली असून, गरज पडल्यास फरार आरोपींच्या नातेवाईकांचेही बँक खाते गोठविण्यात येणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. दरम्यान, मृत सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख बीड शहर पोलिस ठाण्यात आले होते यावेळी सीआयडीचे अधीक्षक सचिन पाटील हे देखील ठाण्यात हजर होते.

### दाऊदला फरफटत आणणार होते, मग कराडला आणायला काय हरकत–आव्हाड



मुंबईः तुम्ही दाऊदला फरफटत अणणार होते. मग वाल्या कराडला आणायला काय हरकत आहे? असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सरकारवर हल्लाबोल केला. मी आका काका म्हणणारा नाही, मी थेट मुंडे यांचे नाव घेतल्याचे आव्हाड म्हणाले. संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड या प्रकरणात आरोपी आहे, मात्र अद्याप जाणीवपूर्वक त्याच्यावर कारवाई होत नसल्याचे आव्हाड म्हणाले. लोकांची मेमरी शॉर्ट आहे. लोकं विसरून जातील. याची ते वाट पाहत आहेत असेही आव्हाड म्हणाले. संतोष देशमुख हत्याप्रकरणी ◀◀ पान २ वर

## भाजपचे दिल्लीत ऑपरेशन लोटस सुरू; केजरीवालांचा गंभीर आरोप

नवी दिल्ली । वृतसंस्था

दिल्ली विधानसभा निवडणूक जवळ येत असताना भाजप विरुद्ध आप एकमेकांवर हल्ला चढवत आहेत. यात गेल्या १५ दिवसांत नवी दिल्ली विधानसभेत अचानक १० हजार मतदारांची वाढ झाली आहे. याबाबत आम्ही निवडणूक आयोगाकडे



तक्रारही केली आहे, असे केजरीवाल म्हणाले.

आपचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी पत्रकार परिषदेत भाजपवर गंभीर आरोप आणि टीकाही केली. केजरीवाल म्हणाले की, ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२७ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः २.५० क्विंटल | २,६०० | २,६०० | २,६०० |
| ज्वारी/हायब्रिड : १९.०० क्विंटल | २,१०१ | २,३९५ | २,२३० |
| मका/लोकलः ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ४१.०० क्विंटल | ६,७०१ | ७,५०० | ७,५०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ७,२०० | ७,२०० | ७,२०० |
| बाजरीः ४.०० क्विंटल | २,८०० | ३,५०० | ३,०७८ |
| मुग : ६.५० क्विंटल | ६,९१० | ६,९१० | ६,९१० |
| सोयाबीनः ७७.५० क्विंटल | ४,०७१ | ४,१११ | ४,०९४ |
| हरभराः ४.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |

# बीड रेल्वे राजुरीपर्यंत धावली ; २६ जानेवारीपर्यंत बीडमध्ये पोहोचणार

## राजुरी परिसरात रेल्वे पाहण्यासाठी नागरिकांनी केली गर्दी

बीड । प्रतिनिधी

गेल्या कित्येक वर्षांचे बीडकरांचे रेल्वेचे स्वप्न आता पूर्णत्वास येत आहे. बीड रेल्वेच्या मार्गातील विघनवाडी ते राजुरीपर्यंत रेल्वे चाचणी सोमवारी पूर्ण करण्यात आली आहे. त्यामुळे, लवकरच बीडपर्यंत रेल्वे धावणार असून, बीडकरांचे स्वप्न आता टप्प्यात आले आहे. येत्या २६ जानेवारी पर्यंत बीडपर्यंत रेल्वे धावू शकणार आहे.



बीडवासीयांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या रेल्वेची चाचणी सोमवारी बीड जवळील राजुरीपर्यंत करण्यात आली. खासदार बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत ही चाचणी झाली असून रेल्वेच्या अधिकाऱ्यांना यापुढील रेल्वे मार्गाबाबत खासदार सोनवणे यांनी काही सूचना केल्या आहेत. शिरुर तालुक्यातील विघनवाडी ते बीडजवळील राजुरीपर्यंत ही पहिली चाचणी केली गेली. रेल्वे कृती समितीने यासाठी खूप मोठा लढा उभा केला होता. ह्या लढ्याचे फळ आणि स्वप्न पूर्ण करण्याचे काम माझ्या काळात पूर्ण होत आहे. राजुरीपर्यंत ही चाचणी झाली असून २६ जानेवारीपर्यंत रेल्वे बीड पर्यंत येणार असल्याचा शब्द मी पूर्ण केल्याचे बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी यावेळी बोलताना म्हटले. दरम्यान, याच वर्षीच्या सुरुवातील आष्टी ते अंमळनेर या ३० किलोमीटरच्या मार्गावर ११० किमी प्रति तास या वेगाने हायस्पीड रेल्वे चाचणी यशस्वी झाली होती. त्यावेळीही, पहिल्यांदाच आपल्या गावात रेल्वे दाखल झाल्याने अंमळनेरकरांनी आनंद व्यक्त केला होता. रेल्वे पाहण्याचे स्वप्न पूर्ण झाल्याने अनेकांनी बोगीत बसून फोटो काढले होते. रेल्वे पाहण्यासाठी अंमळनेरसह परिसरातील ग्रामस्थांनी स्टेशनवर मोठी गर्दी केली होती. तिथून बीडचे अंतर ७० किमीच राहिले होते, आता राजुरीपर्यंतची रेल्वे चाचणी पूर्ण झाल्याने ◀◀ पान २ वर

# राज्यात हजारो हेक्टरवरील पिकांचे नुकसान !

## अवकाळी आणि ढगाळ वातावरणाचा बळीराजाला फटका, शासनाने तात्काळ मदत करण्याची मागणी

पुणे । प्रतिनिधी

राज्यात गेल्या दोन दिवसात झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा फटका शेतकऱ्याला बसला आहे. जळगाव, धुळे, सांगली या तिन्ही जिल्ह्यांत तर उभ्या पिकाचे नुकसान झाले असूनख हातातोंडाशी आलेले पीक वाया गेले आहे. यामुळे सरकारने तातडीची मदत जाहिर करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली असून तब्बल २,६०० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे.

राज्यात गेल्या दोन दिवसापासून पडणाऱ्या पावसामुळे रब्बी पिकांचे नुकसान झाले आहे. यामुळे अनेक जिल्ह्यात बळीराजा संकटामध्ये आला आहे. पुणे कृषी विभागाने सध्याच्या घडीला २,६०० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याची माहिती दिली आहे, मात्र राज्यभरात यात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. जळगाव जिल्ह्यातील यावल आणि रावेर येथे अवकाळी झाल्याने केळी बागांचे



नुकसान झाले आहे. वादळी पावसामुळे केळीच्या उभ्या बागा भूईसपाट झाल्या असून, उत्तर महाराष्ट्रात गव्हाचे पीक आडवे झाले आहे. अनेक ठिकाणी हरभऱ्याचे देखील नुकसान झाल्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. याशिवाय तूर आणि कापसाचेही नुकसान झाले आहे. वादळी पावसाचा फटका धुळ्याच्या शिरपूर तालुक्यालादेखील बसला. येथे केळी, पपई, हरभरा, गहू आणि कांद्याचे नुकसान झाले आहे. यामुळे आमदार काशीराम पावरा यांनी नुकसानीची पाहणी करत कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी, नाशिक व येवला या तीन तालुक्यातील २३ गावांमध्ये अवकाळी पावसामुळे नुकसान झाले आहे. जिल्ह्यातील १७२ हेक्टरला फटका बसला आहे. तसेच येवला तालुक्यात पावसामुळे गहू पिकाचे मोठे नुकसान झाले असून ३ वर्षात शेतकऱ्यांचं ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# टोल लुटारूंना चपराक!

टोल भरून हैराण झालेले वाहतूकदार, व्यापारी, नागरिक यांना दिलासा देणारा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. 'बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा' अर्थात बीओटी तत्त्वानुसार बांधण्यात आलेल्या रस्त्याचा टोल किती काळ वसूल व्हावा याबाबत दिशा देणारा हा निकाल आहे. महामार्ग बांधकामासाठी केलेला खर्च आणि त्यावरील नफा लक्षात घेऊन तो मिळाल्यानंतर करारात दाखवलेल्या कालमर्यादेचा विचार न करता टोल बंद झाला पाहिजे असे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत आणि उज्वल भुयान यांनी निकालात म्हटले आहे. सरकारी अधिकाऱ्यांची कार्यपद्धती आणि ते राबवत असलेल्या धोरणातून जनतेची पिळवणूक नव्हे तर सेवा झाली पाहिजे. त्यांचे धोरण कोणत्याही खासगी व्यवसाय आणि संस्थांना समृद्ध करण्यासाठी नसावे. कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला सार्वजनिक मालमत्तेतून मोठा नफा कमवण्याची परवानगी कोणत्याही परिस्थितीत दिली जाऊ शकत नाही असे न्यायालयाने म्हटले आहे. इतकेच नव्हे तर ठेकेदाराला उपयुक्त ठरेल आणि त्याची संपत्ती प्रचंड वाढवेल अशा प्रकारचा करार तयार करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. हा निकाल देशभर सुरू असणाऱ्या टोळधाडीला रोखण्यासाठी उपयुक्त ठरेलच शिवाय शासनाच्या विविध विभागात ठेकेदार धार्जिण्या धोरणाविरोधात लढणाऱ्या प्रामाणिक कार्यकर्ते, संघटनांचे बळही वाढवेल.

हे प्रकरण होते दिल्ली आणि उत्तर प्रदेश सरकारशी संबंधित. दोन्ही सरकारांनी मिळून खासगी व्यावसायिकांकडून 'बीओटी' तत्त्वावर तयार केलेल्या उड्डाणपूल बांधकामासाठी १९०० कोटी खर्च आला. नफ्यासह या पुलावर टोल वसूल करण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी ३० वर्षांची परवानगी दिली. त्यातही त्याचा खर्च भरून निघाला नाही तर त्याला वसुलीची मुदत वाढवून देण्याचा करार केला गेला. पण मुदतपूर्व वसुली आणि नफा मिळाला तर टोल कधी बंद करणार याची कोणतीही तरतूद या करारात करण्यात आली नाही. दोन राज्य सरकार आणि त्यातील अधिकाऱ्यांचा अप्रामाणिकपणा या करारात आपोआपच उघड होतो. पण त्यासाठी जनतेला २०१६ पासून २०२४ पर्यंत म्हणजे टोल वसुली पूर्ण झाल्यानंतरही आठ वर्षे झगडावे लागले शिवाय तितका काळ टोल द्यावाच लागला. पहिल्या पंधरा वर्षातच ठेकेदाराला मुद्दल रकमेसह मोठा नफा झाला असताना त्यांना उच्च न्यायालयात न्याय मिळाला तरी ठेकेदार सर्वोच्च न्यायालयात गेल्याने लढा सुरूच राहिला. फेडरेशन ऑफ नोएडा रेसिडेंट्स वेल्फेअर असोसिएशनने हा लढा दिला. त्याबद्दल त्या संस्थेचे देशभर कौतुक झाले पाहिजे. टोल प्रकरणाचे गांभीर्य किती आहे याचे एक उदाहरण माहिती अधिकारातून नुकतेच उघड झाले. ते होते राजस्थानातील जयपूर दिल्ली महामार्गाचे. काम १९०० कोटीत झाले आणि मनोहरपुर या एकाच टोल प्लाझामधून आतापर्यंत ८ हजार कोटी रुपये टोल वसूल करण्यात आला आहे. हा रस्ता एक अप्रतिम रस्ता आहे याबद्दल वादच नाही. पण त्यासाठी लोकांनी आपल्या खिशाला किती चाट लावून घ्यायची?

भारतातली वाढती वाहतूक लक्षात घेता देशभरातील सर्व केंद्रीय आणि राज्य शासनाच्या टोल नाक्यांवर वसुलीची कालमर्यादा कमी करण्याचे धोरण आखले पाहिजे. मात्र अनेक नाक्यांवर ठराविक काळानंतर लोकप्रतिनिधी करत असलेला कब्जा आणि ठिकठिकाणच्या राज्य शासनाला आपले सरकार बळकट ठेवण्यासही नाराजांची सोय म्हणून या टोलकडे पहावे लागते. अशाने पुणे ते बेंगलोर या महामार्गाची किंवा मुंबई गोवा महामार्गाची दुर्गती पदरी पडते.

अशा काळात आलेला हा निकाल एक आशा निर्माण करतो. पण, त्याचवेळी आहे त्याच रस्त्याची चार पदरीची सहा पदरी अशी दर्जा वाढ करण्याच्या नावाखाली त्याच त्या ठेकेदारांना तेच रस्ते सोपवून दुरुस्ती देखभालीचा काळ गायब करायचा आणि काम सुरू असतानाही वसुलीला परवानगी द्यायची हे गंभीर प्रकार सध्या सर्वत्र घडत आहेत. राज्याची स्थितीही वेगळी नाही. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने महत्त्वाकांक्षी म्हणून पूर्ण केलेला समृद्धी महामार्ग प्रकल्पावर ठेकेदार वाहन चालकांना सेवा देत नाही म्हणून तब्बल ६९ नोटीस देण्यात आल्या. तरी सरकारला त्यांनी जुमानले नाही. शेवटी सरकारने ठेकेदाराची वसुली काही काळ थांबवली.

गेल्या २४ वर्षांत तब्बल २ लाख दहा हजार कोटी टोल वसूल झाला तर पीपीपीद्वारे दीड लाख कोटी वसूल केले असे सरकारी आकडे आहेत. ४५ हजार किलोमीटर मार्गावर ही वसुली आहे. गेल्या पाच वर्षांत सरकारने आणखी १०.२ लाख कोटीचे राष्ट्रीय महामार्ग मंजूर केले असून मोदी सरकारच्या यंदाच्या पहिल्या १०० दिवसात ५० हजार कोटींच्या रस्त्यांना मंजुरी दिली गेली आहे. अशावेळी नव्या टोल वसुलीला सुरुवात होताना जुने बंद झालेच पाहिजेत. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा उपयोग स्थानिक कार्यकर्ते, संस्थांनी अवास्तव टोल बंद करण्यासाठी केला पाहिजे. सरकारनेही त्यासाठी प्रामाणिक धोरण आणून टोलदात्यावर्गाचे हित साधले पाहिजे.

# स्व.संतोष देशमुख यांना न्याय मिळावा यासाठी वैजनाथ सुरवसे यांचे उपोषण

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाचा चौथा दिवस




**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणी त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा या मागणीसाठी परळी येथील वैजनाथ सुरवसे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करत आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी अशी मागणी केली आहे. याबरोबरच देशमुख यांच्या कुटुंबीयांना संरक्षण मिळावे, त्यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन व्हावे, कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीत सामावून घ्यावे, या प्रकरणातील मुख्य सूत्रधार वाल्मीक कराड यांना तात्काळ अटक करून त्यांच्या पाठीराखे राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी त्यांनी केली आहे. याशिवाय बीड जिल्ह्यामध्ये जे बेकायदेशीर शस्त्र आहेत .अशा शस्त्र बाळगणाऱ्या नागरिकांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली आहे. जिल्ह्यामध्ये खुनाचे प्रयत्न, खंडणीचे प्रयत्न ,आदी बाबी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत ,शासकीय जमिनी लाटणे असे प्रकार जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात आहेत. या सर्व जमिनी शासनाने ताब्यात घ्याव्यात अशी मागणी वैजनाथ सुरवसे यांनी केली आहे. आज वैजनाथ सुरवसे यांच्या उपोषणाचा चौथा दिवस आहे.

## श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथे शनिप्रसाद गोशाळेत गोपूजनसह नवीन शेडचा लोकार्पण सोहळा

# श्री शनिप्रसाद गो शाळेला निधी कमी पडू देणार नाही-आ.विजयसिंह पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

**श्री क्षेत्र राक्षसभुवन सारख्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी वारकरी परंपरा जोपासावी आणि बहरावी यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे तिर्थराज महाराज पठाडे यांनी सुरु केलेल्या श्री शनि प्रसाद गोशाळेचे गेल्या अनेक वर्षांपासून निस्वार्थ भावनेतून काम सुरु आहे. या कामी आपलाही खारीचा वाटा राहिल तसेच भविष्यात शनिप्रसाद गो शाळेसाठी निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन गेवराई विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांनी यावेळी बोलताना** दिले.



गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन येथील श्री शनी प्रसाद गोशाळेत गोमाता पूजन व नवीन गोशाळेच्या शेडचा लोकार्पण सोहळा सोमवार दि.३० डिसेंबर रोजी संपन्न झाला. यावेळी श्री क्षेत्र मच्छिंद्रगड संस्थानचे मठाधिपती श्री. ह.भ.प. जनार्दन महाराज यांच्या शुभहस्ते पूजन करण्यात आले तर आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा संपन्न झाला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जय भवानी सहकार साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन भाऊसाहेब नाटकर यांच्यासह वारकरी संप्रदायातील संत-महंतांसह राक्षसभुवन आणि पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते. पुढे बोलताना आ.पंडित म्हणाले की मी जोपर्यंत आमदार आहे तोपर्यंत श्री शनि प्रसाद गोशाळेला कसलाही प्रकारचा निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन त्यांनी उद्घाटन प्रसंगी बोलताना दिले. तर श्री शनिप्रसाद गोशाळेचे संस्थापक श्री ह भ प तीर्थराज महाराज पठाडे यांनी गोमातेचे विशेष महत्त्व सांगून प्रत्येकाने गोमातेचा सांभाळ करावा असा मौलिक सल्लाही यावेळी दिला. यावेळी लोकार्पण सोहळ्यास भाऊसाहेब शिंदे, राजेंद्र डाके, तात्या नाटकर, काकासाहेब नाटकर, प्रदीप काळम, पांडुरंग डाके, कल्याण पठाडे, शांतीलाल वाव्हाळ, अशोक जैन, अशोक नाटकर, संदीप नाटकर, डॉ. अमोल नाटकर, बापूसाहेब घमाट सह आदी गोभक्त उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक ज्ञानेश्वरी सेवक गणेश महाराज बोचरे यांनी तर उपस्थितांचे आभार गोशाळचे सचिव एकनाथ महाराज पठाडे यांनी व्यक्त केले.

# प्रयागराज येथे होणार ऐतिहासिक,सामाजिक,अध्यात्मिक अमृत कुंभमेळा

## १००८ महामंडलेश्वर स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वती महाराज यांचे प्रस्थान; भाविकांनी कुंभमेळयासाठी उपस्थित रहाण्याचे आजीनाथ गवळी यांचे आवाहन

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

**दर बारा वर्षांनी येणारा कुंभमेळा उत्तरप्रदेशातील त्रिवेणीसंगम,तिर्थराज प्रयाग येथे ऐतिहासिक,सामाजिक,अध्यात्मिक अमृत कुंभमेळा होत असून या कुंभ मेळाव्यासाठी श्रीक्षेत्र इंदुवासिनीदेवी,गणेशानंद गड पिंपळनेर या संस्थानचे महंत श्री.१००८ महामंडलेश्वर स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वती महाराज यांनी महामंडलेश्वर स्वामी अभेदानंद महाराज बदलापूर,ह.भ.प.भक्तीदास म.शिंदे महाराज यांच्यासह परिसरातील संत-महंत,मान्यवर व भाविकांच्या उपस्थितीमधे मोठया उत्साहात प्रस्थान झाले.**

उत्तरप्रदेश मधील तीर्थराज प्रयाग येथे यावर्षीचा जागातीक स्तरावरील व ऐतिहासिक अमृत कुंभमेळा ६ डिसेंबर ते ३ फेब्रुवारी या कालावधीमधे संपन्न होत असून दि.६/१२/२०२४ रोजी महाकुंभ छावणी पुजन,दि.२२/१२/२०२४ रोजी महाकुंभ धर्मध्वज स्थापना विधी,दि.१४/१/२०२५ रोजी प्रथम स्नान,दि.२९/१/२०२५ रोजी द्वितीय स्थान,दि.३/२/२०२५ रोजी तृतीय स्थान हा कुंभमेळा होत असून या कुंभमेळाव्यामधे श्रीक्षेत्र इंदुवासिनीदेवी,गणेशानंद गड पिंपळनेर या संस्थानचे महंत श्री.१००८ महामंडलेश्वर स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वती महाराज यांचा श्री.पंचायती महानिर्वाणी आखाडा छावणी असून स्वामीजींचे



प्रस्थान झाले.गणेशानंद गड,पिंपळनेर,गोमळवाडा,रूपूर,कोळवाडा व शिरूर शहर याठिकाणी भव्यमिरवणूकीने महाराजांचे प्रस्थान झाले.भाविकांनी ठिकठिकाणी,रांगोळी काढत औक्षण करुन फुलांचा वर्षाव करत महाराजांचे स्वागत केले.यावेळी सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी महाराज यांना कुंभमेळ्यासाठी शुभेच्छा देऊन परिसरातील व जिल्हातील भाविकांनी कुंभमेळयासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले. यावेळी श्री.ह.भ.प.भक्तीदास महाराज शिंदे, ह.भ.प.भगवान महाराज बारगजे,सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी, गणेशानंद महाराज आव्हाड,पिंपळनेरचे सरपंच,मिठु जायभाये,ज्ञानदेव केदार,उपसरपंच बाळु बडे,मधुकर जायभाये,निलेश उगलमुगले,राजकुमार पालवे,दशरथ खाडेकाका, श्रीम.आशा मिसाळ,कु.योगीता गवळी,सचिन जायभाये,उदधव नागरगोजे,एकनाथ महाराज केदार,विक्रम गोल्हार,संभाजी जायभाये,सावळेराम जायभाये,दादासाहेब मुरगुंड,ज्ञानोंबा काकडे,प्रकाश साळवे,अशोक डोके,सोपान गर्जे,हरिप्रसाद हारिदास,बाळासाहेब पवार,लहु सातपुते,किरण गारूडकर,मारूती कातखडे,अंकुश गवळी, जगन्नाथ बनकर,गणेश कातखडे,रामकिसन दहिफळे, अशोक बारगजे,संदीप जायभाये,विठ्ठल कोकाटे, बाळु बारगजे,शेषेराव नाना जायभाये,शिवाजी जायभाये,बाबुराव केदार,अमोल बारगजे,दत्तु देवढे,विनोद बारगजे,श्रीराम जगताप,दादा ससाने,विठ्ठल गर्जे,राजु दहिफळे,रामकिसन जायभाये,बारीकराव जायभाये आदींसह परिसरातील व तालुक्यातील भाविकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# खुंटेफळ आरोग्य केंद्रास ५ वाजता असते कुलूप, रुग्णांची हेळसांड

## वैद्यकीय अधिकारी यांचा मनमानी कारभार; जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी कारवाई करावी ग्रामस्थांची मागणी

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील कुंभेफळ येथील अतिशय निष्काळजीपणाचा प्रकार चालू असून कुंबेफळ गावातील संजय जगधने यांची मुलगी काजल सोमनाथ शेलार यांना २७ डिसेंबर.२०२४ रोजी सायंकाळी ५:५० वाजता प्रसूतीसाठी खुंटेफळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये घेऊन गेले असता सायंकाळी ६ सहा वाजता दवाखान्याचे कर्मचारी व वैद्यकीय अधिकारी असताना दवाखान्याला कुलूप होते.**

त्यामुळे त्या महिलेची राहत्या घरी प्रसूती झाली डॉक्टरांना कॉल केला असता डॉक्टरांनी बाळ मयत आहे का जिवंत आहे याची खात्री न करता फोन कॉल करून ॲम्बुलन्स ड्रायव्हर यांना आधी सांगितले आष्टीला घेऊन जा नंतर परत फोन करून सांगितले नगरला घेऊन जा डॉक्टरांच्या हलगदरीपणामुळे त्या माता माऊलीला आपल्या बाळाला गमवावे लागले.असा भयंकर प्रकार झाला आहे.खुंटेफळ प्राथमिक आरोग्य केंद्र या परिसरातील गोरगरीब गरजू रुग्णांना सुविधा देण्याचे एकमेव सुविधा केंद्र आहे त्यामुळे गांभीर्याने विचार



करावा, या आधी पण तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडे सरपंच यांनी या अगोदर तक्रार दाखल केली होती त्यावर काहीही ॲक्शन घेतली नाही. वैद्यकीय अधिकारी यांचा मनमानी कारभार सुरू असून या गोष्टीकडे जिल्हा आरोग्य अधिकारी तालुका आरोग्य अधिकारी यांनी गांभीर्याने लक्ष द्यावे अशी लेखी मागणी कुंबेफळ गावचे सरपंच दिपक गाडे यांनी आ सुरेश धस व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे केली आहे.

# वर्धमान महावीर इंग्लीश स्कूल च्या वार्षिक स्नेह-संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कडा । प्रतिनिधी**

कडा येथील 'वर्धमान महावीर चॅरीटेबल ट्रस्ट ' संचलित महावीर इंग्लिश स्कूल या सी.बी.एस.ई. बोर्ड मान्यताप्राप्त शाळेचा उडाण -२०२४ हा १३ वा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम दिमाखात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे भुमी अभिलेख विभागाचे अप्पर आयुक्त मा.श्री.आनंद भंडारी (आय ए एस) उपस्थित होते. त्याच बरोबर संस्थेचे अध्यक्ष- श्री अमित राठोड, उपाध्यक्ष- श्री.संदिप चानोदीया, सचिव- श्री हेमंत मेहेर ,कोषाध्यक्ष - डॉ. प्रमोद भळगट तसेच संस्थेचे इतर पदाधीकारी श्री मनिष गांधी, श्री. प्रकाश श्रीश्रीमाळ, श्री. अमोल पटवा , श्री. संजय पितळे, श्री. संतोष गांधी, सल्लागार श्री.पी.जी. मेहेर सर, मुख्याध्यापक- के.अभिलाष इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.



अध्यक्षीय भाषणामध्ये प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी वाचनाकडे वळले पाहिजे, सोशल मीडिया पासून दूर राहिले पाहिजे. त्याचबरोबर वक्तृत्व, खेळ, वेगवेगळया कला जोपासल्या पाहिजे.तरच तुम्ही जीवनामध्ये यशस्वी होऊ शकतात.अशा प्रकारे मार्गदर्शन त्यांनी उपस्थित विद्यार्थी आणि पालकांना केले. या कार्यक्रमामध्ये ''नवरस'' या संकल्पनेवर आधारीत शृंगार , हस्य , करुण, रौद्र, वीर, भय , बिभतस्य, अदभुत, शांत रस अशा नऊ रसावर चिमुकल्यांनी अप्रतिम असा नाट्य,नृत्य आविष्कार सादर करून प्रेक्षकांची मने जिकली,त्याचबरोबर मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र यांची रथयात्रा कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले,त्यांच्या रथ यात्रेतील प्रसंगाने साक्षात प्रभू रामचंद्रांचे दर्शन झाले.या प्रसंगाना प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. या कार्यक्रमाला कडा आणि कडा परिसरातील पालकवर्ग आणिक्ष शिक्षणप्रेमी नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी पार पडला.

# पान १ वरून...

### पीकविम्यातून

कृषी विभाग 'ॲक्शन मोड'वर आला आहे. कृषी विभाग आधीपासूनच विम्यातील गैरप्रकार शोधत आहेत. विमा योजनेतील गैरव्यवहार शोधण्याचे आदेश कृषी विभागाच्या सचिव व आयुक्तांनी यापूर्वीच दिले होते. त्यामुळे राज्यभर तपासणी मोहिमा हाती घेण्यात आल्या आहेत. यातील काही मोहिमा अजूनही सुरूच आहेत. विमा प्रस्तावांच्या तपासणीत काही जिल्ह्यांमधील हजारो महसुली गावांचा बोगस विमा काढण्यासाठी उपयोग केल्याचे आढळले आहे. महसूली यंत्रणेच्या दप्तरी सातबारा नसतानाही घोटाळेबाजांकडून विशिष्ट गावांचे बोगस सातबारा उतारे दाखवून विमा प्रस्ताव तयार केले आहेत. विमा भरताना ही गावे संकेतस्थळावर उपलब्ध होतात. म्हणजेच या गावांचे सातबारा उतारे नाहीत पण विमा पोर्टलवर या गावांची नोंद आहे. त्यामुळे घोटाळेबाजांचे काम सोपे होते, असे तपासात आढळले आहे. कृषी विभागाने ही गावे विमा पोर्टलवर दिसून नयेत, याची मागणी केली. ही गावे ब्लॉक करावीत म्हणजेच विमा पोर्टलवरून काढावीत, अशी राज्य शासनाला शिफारस केली आहे. सातबारा नसलेली पण विमा पोर्टलवर विमा भरण्यासाठी उपलब्ध असलेली किमान २४०० पेक्षा जास्त गावे आहेत. ही गावे केवळ एका जिल्ह्यात नाहीत तर अनेक जिल्ह्यांमधील आहेत. गेल्या दोन वर्षांपासून या गावांमध्ये बोगस विमा अर्ज दाखल करण्याचे प्रकार सुरु आहेत.

-----------

### बीडनंतर बुलढाण्यात

लक्षणीय आहे. आंदोलकांच्या हातात काळे झेंडे असून, हातामध्ये काळे बँड घातले आहेत. काही आंदोलकांच्या हातामध्ये संतोष देशमुख यांना न्याय द्या, सर्व आरोपींना अटक करा, असा मजकूर असलेले पोस्टर देखील आहेत. धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी आदोलकांमधून होत आहे. हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवा, आरोपींना फाशी द्या अशी मागणी देखील आंदोलकांनी केली आहे. या मोर्चामध्ये संतोष देशमुख यांचे कुटुंब देखील सहभागी झाले होते. यावेळी संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी देशमुख म्हणाली की स्फूर्ती घेण्यासाठी आम्ही सिंदखेड राजा येथे आलो आहोत. जी घटना झाली त्याचा न्याय मिळाला पाहिजे, मोर्चात मोठ्या संख्येनं सहभागी व्हा, वडिलांची प्रत्येक क्षणाला आठवण येते. तुमची साथ कायमस्वररुपी राहू द्या, मुख्यमंत्र्यांना विनंती करते की त्यांनी वडिलांना न्याय द्यावा. त्यांना अशी शिक्षा द्या की पुन्हा असा गुन्हा कोणी केला नाही पाहिजे, अशी मागणी यावेळी वैभवी देशमुख हिने केली. या मोर्चामध्ये राजेंद्र शिंगणे देखील सहभागी झाले होते. हे प्रकरणं फास्ट ट्रॅक कोर्टात चालवा, आरोपींना फाशी द्या. धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी शिंगणे यांनी केली आहे.

---------

### धनजंय मुंडे यांनी घेतली मुख्यमंत्री

मुंडे यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्याने चर्चांना उधाण आले आहे. दरम्यान, सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांड प्रकरणात अद्याप कराड याचे नाव आलेले नाही, परंतु पवन ऊर्जा निर्मितीच्या आवादा ऊर्जा प्रकल्पाच्या खंडणी प्रकरणात ते आरोपी आहेत. गुन्हा दाखल झाल्यापासून कराड फरार असून हा तपास आता सीआयडीमार्फत सुरू आहे.

---------

### दाऊदला फरफटत आणणार होते, मग

३०२ चा गुन्हा दाखल झाला आहे. मात्र, त्यामुध्ये वाल्मिक कराडचे नाव नसल्याचे आव्हाड म्हणाले. सभागृहात तुम्ही सांगून देखील या प्रकरणात अद्याप काही कारवाई नाही असे जितेंद्र आव्हाड म्हणाले. अजित पवार यांनी अद्यापपर्यंत कोणतीच जबाबदारी घेतली नाही असेही आव्हाड म्हणाले. उलट सभागृहात अजित पवार यांनी सुरेश धस यांना डोळा डोळा म्हणत खुणवत होते असे आव्हाड म्हणाले. त्यांचा उद्देश काय होता हे मला माहित नाही असे आव्हाड म्हणाले. अण्णा हजारेंनी आरोप केल्यावर पवारसाहेबांनी सुरेश जैन, नवाब मलिक, पद्मसिंह पाटील, विजयकुमार गावीत यांचे राजीनामे घेतले होते असेही आव्हाड म्हणाले.

----------

### शस्त्रांची गरज नसणाऱ्यांचे परवाने

दिली. शस्त्रांच्या सर्व फाईल्सचा तपास सुरु असून, शस्त्र देण्याचा अधिकार जिल्हाधिकारी कार्यालयाकडे असतो. पोलिस कायदा आणि सुव्यवस्थेच्या हिशोबाने ॲनालिसिस करते. संबंधित व्यक्तीची पास्ट हिस्ट्रीचा हिशोबाने प्रत्येक फाईलची आम्ही ॲनालिसिस करणार. जिथे शस्त्राची गरज नाही तिथे आम्ही तशी शिफारस करणार, अशी प्रतिक्रिया एसपी नवनीत कॉवंत यांनी दिली.

------------

### बीड रेल्वे राजुरीपर्यंत धावली ;

पुढील काही दिवसांतच बीडपर्यंत रेल्वे धावणार आहे. बीडकरांच्या लोहमार्गाची स्वप्नपूर्ती आता प्रत्यक्षात येत आहे. दरम्यान. आजही राजुरी रेल्वे स्थानकाजवळ बीडकरांनी रेल्वे चाचणी पाहायला गर्दी केली होती, यावेळी अनेकांनी धावत्या रेल्वे इंजिनसोबत फोटोही काढले.

------------

### भाजपचे दिल्लीत ऑपरेशन लोटस

या निवडणुकीत बनावट मतदान करण्याची भाजपची योजना आहे. नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघात अचानक १० हजार मतदान वाढलेले आहे. केजरीवाल स्वतः नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. तसेच एक दिवसापूर्वी दिल्ली भाजपने मतदारांच्या संख्येत फेरफार केल्याचा आरोपही आपने केला होता. दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि आपमध्ये आरोपांचा कलगीतुरा रंगला आहे. दोन्ही बाजूंनी विविध मुद्द्यांवर आरोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत.

------------

### राज्यात हजारो हेक्टरवरील

१८० कोटीचे नुकसान झाले आहे. सांगली जिल्ह्यामध्ये बदलत्या हवामानामुळे द्राक्ष शेती संकटात आली असून द्राक्षबागा वाया जाण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. हवामान बदलामुळे द्राक्ष घडकुजणे रोगाचा प्रादुर्भाव वाढला असून शेतकरी बागा वाचवण्यासाठी फवारण्या करण्यात व्यस्त झाले आहेत. धाराशिव जिल्ह्यात रब्बी हंगामासाठी हरभरा, ज्वारी, मका पेरण्यात आला आहे. पण अवकाळी पावसामुळे पिकांवर किड रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. तुळजापूर तालुक्यातील खरबूज फळबागांवर करप्या रोग पडत असून शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. तिकडे विदर्भातील अनेक जिल्ह्यात पावसाने मोठे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी संकटात सापडला असून, शासनाने तात्काळ मदत करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार....

मंगळवार, दि.३१ डिसेंबर २०२४




## रेल्वे स्टेशन परिसरात अल्पवयीन मुलीवर अत्याचार; पोलिसांकडून आरोपी तात्काळ अटक

**जालना । प्रतिनिधी**

परप्रांतीय कामगाराने अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची घटना जालना रेल्वे स्टेशन परिसरात घडली. याप्रकरणी कदीम जालना पोलीस गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी उत्तर प्रदेशला पळून जाण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी त्याला अटक केली. फैजान खान असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

जालना रेल्वे स्टेशन परिसरात इमारतीचे बांधकाम सुरू आहे. या बांधकामाच्या ठिकाणी पीडितेचे वडील वॉचमनची नोकरी करतात. यामुळे पीडितेचे कुटुंब तेथेच राहते. आरोपीही याच इमारतीत फरशी बसवण्याचे काम करत होता. चार दिवसांपूर्वी पीडिता इमारतीच्या वरच्या मजल्यावर कपडे वाळत टाकण्यासाठी गेली असता आरोपीने तिच्यावर बाथरुममध्ये बळजबरीने नेत बलात्कार केला. मात्र बदनामीच्या भीतीने पीडिता आणि तिच्या कुटुंबीयांनी याबाबत कुठेही वाच्यता केली नाही.

दुपारी पीडिता कपडे वाळत घालण्यासाठी गेली असता आरोपीने पुन्हा तिच्यावर बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. यावेळी मुलीने आरडाओरडा करताच आरोपी पळून गेला. यानंतर पीडितेच्या कुटुंबीयांनी कदीम जालना पोलीस ठाणे गाठत तक्रार दाखल केली. मुलीच्या फिर्यादीवरून पोलिसांनी बलात्कार, विनयभंग तसेच ॲट्रोसिटी कायदा आणि पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल केला. यानंतर पोलीस पथकाने आरोपीचा शोध सुरू करत पळून जाण्याच्या तयारीत असल्याचे निदर्शनात येतात पोलिसांनी तात्काळ आरोपी ला पकडून पोलीस स्टेशनमध्ये हजर केलं पुढील तपास पोलीस करीत आहे.

# ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर नसल्याने रूग्णांचे हाल, खासगी दवाखान्यात गर्दी

मंठा । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील शेवटचा तालुका म्हणजे मंठा ग्रामीण रुग्णालय म्हणजे असून अडचण नसून खोळंबा अशी अवस्था झाली असून पेशंटला योग्य उपचार मिळत नसल्याने खाजगी दवाखान्यात जाऊन महागडे उपचार घेण्याची वेळ आली आहे. याप्रकरणी जिल्हा अधिकारी राजेंद्र पाटील यांनी तत्काळ लक्ष्य देण्याची मागणी होत आहे. या प्रकरणी गरीब रुग्णालय आर्थिक परिस्थिती गरीब असल्याने अनेक रुग्णांना उपचाराविना गावी परतावे लागत असल्याचे प्रकार घडत असल्याचे दिसून येते. रविवारी तर ग्रामीण रुग्णालयाला सुट्टी



असल्यासारखी परिस्थिती असते. देवगाव खवणे येथील शिवाय सदाशिव मोरे या सहा वर्षीय बालकाला त्याचे पालक आकाश मोरे यांनी कानाच्या दुखण्यामुळे दुपारी साडेतीन वाजता ग्रामीण रुग्णालयात आणले होते. यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे सर्व बेड रिकामे होतेच शिवाय एकही कर्मचारी आढळून आला नाही अशी तक्रार आकाश मोरे यांनी प्रसिद्धी माध्यमांकडे केली. तब्बल एक तास वाट पाहिल्यानंतर एक महिला डॉक्टर त्या ठिकाणी उपस्थित झाल्या परंतु कानाच्या दुखण्यावर आमच्याकडे कोणतेही प्रकारचे ड्रॉप उपलब्ध नाही असे सांगितल्याची माहिती श्री मोरे यांनी दिली. मंठा ग्रामीण रुग्णालयात मागील चार सहा महिन्याच्या कालखंडापासून काही नवीन डॉक्टर्स आले असले तरीही शहरातील अथवा तालुक्यातील लोकप्रतिनिधींना डॉक्टर कोण उपलब्ध आहेत ? याची माहिती नाही. पेशंटच्या नातेवाईकांनी लोकप्रतिनिधींकडे तक्रार केल्यास कोणत्या डॉक्टरांशी संपर्क साधावा अथवा ड्युटीवरील डॉक्टर्स कोण आहेत याची कल्पना नसल्याने लोकप्रतिनिधी सुद्धा रुग्णांची किंवा नातेवाईकांची कुठलीही मदत करू शकत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर आणि लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वयाचा अभाव दिसून येतो. त्यामुळे रुग्णांना योग्य उपचार मिळण्यास अडचणी निर्माण होत आहेत. शासनाची रुग्ण कल्याण समिती सुद्धा कागदावरच असून या गंभीर प्रकाराकडे लोकप्रतिनिधींनी लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

## स्व. संतोष देशमुख यांना न्याय मिळावा यासाठी वैजनाथ सुरवसे यांचे उपोषण

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणी त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा या मागणीसाठी परळी येथील वैजनाथ सुरवसे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करत आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी अशी मागणी केली आहे. याबरोबरच देशमुख यांच्या कुटुंबीयांना संरक्षण मिळावे, त्यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन व्हावे, कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीत सामावून घ्यावे, या प्रकरणातील मुख्य सूत्रधार वाल्मीक कराड यांना तात्काळ अटक करून त्यांच्या पाठीराखे राज्याचे मंत्री धनंजय मुंडे




यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी त्यांनी केली आहे. याशिवाय बीड जिल्ह्यामध्ये जे बेकायदेशीर शस्त्र आहेत .अशा शस्त्र बाळगणाऱ्या नागरिकांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली आहे. जिल्ह्यामध्ये खुनाचे प्रयत्न, खंडणीचे प्रयत्न ,आदी बाबी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत ,शासकीय जमिनी लाटणे असे प्रकार जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात आहेत. या सर्व जमिनी शासनाने ताब्यात घ्याव्यात अशी मागणी वैजनाथ सुरवसे यांनी केली आहे. आज वैजनाथ सुरवसे यांच्या उपोषणाचा चौथा दिवस आहे.

## आ.अर्जुन खोतकर यांच्या जन्मदिवसानिमित्त लक्ष्मीनारायणपुरा येथे आरोग्य शिबिर संपन्न

**जालना । प्रतिनिधी**

आ.अर्जुनभाऊ खोतकर यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने प्रभाग २२ व २३ महायुती मित्र मंडळ व ओझेस मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते

या शिबिराचे उद्घाटन आमदार अर्जुन खोतकर यांच्या हस्ते झाले.तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष अरविंद चव्हाण. प्रमुख पाहुणे म्हणून श्री राजेश राऊत.ब्रह्मानंद चव्हाण. विष्णू पाचफुले. पंडित भुतेकर अनिरुद्ध भाऊ खोतकर सौ शकुंतला कदम. सौ संध्या संजय देठे.मिर्झांवर बेग.दिनेश भगत. शुभम टेकाळे.अरिहंत मेका. महिंद्र मंचेवार.राजकुमार गुंटुक. बालाजी अडियल.गणेश जल्देवार. रमेश मुळे. एडवोकेट राहुल हिवराळे होते



ओजस हॉस्पिटलचे डॉक्टर श्रीमंत लाखे पाटील डॉक्टर सुरजसिंह तौर व त्यांची संपूर्ण टीम यांनी तपासणी केली

याप्रसंगी माननीय आमदार अर्जुन चव्हाण माननीय शकुंतला कदम राजेश राऊत सौ संध्या देठे यांनी आपले मनोगत व्यक्त केले

आमदार अर्जुन खोतकर यांनी आपले अध्यक्षीय भाषणात जालना विधानसभा मतदारसंघात गरजू गोरगरिबांसाठी आरोग्याची सेवा आणखीन बळकटीकरण करून आरोग्य सेवेकडे प्रथमतः सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल असे सांगितले

महिलांनी कुठल्याही संकोच न बाळगता आपल्या सर्व समस्या डॉक्टरांना सांगून त्याचे निदान करण्याचे आवाहन आमदार अर्जुन खोतकर यांनी केले. या शिबिरात जवळपास पाचशे महिलांनी पुरुषांनी आपली तपासणी करून घेतली. महेंद्र मंचवार यांनी तयार केलेल्या नवीन वर्षाच्या कॅलेंडरचे विमोचन माननीय आमदार अर्जुन खोतकर व मान्यवराच्या शुभहस्ते करण्यात आले.शिबिर यशस्वी करण्यासाठी आर्यन मेका.महिंद्र मंचेवार.मोहन मंचेवार. शुभम टेकाळे.बालाजी टेकाळे. अरुण पवार.राजकुमार गुजर. अभिषेक गुंजकर.आकाशलाखापती. भगवानचे पाच श्रीविनाश मंचेवार गणेश गुड्डा मनोज मनोज देवरे सागर गुंटूर किशोर शिंदे राजू पेदराम बालाजी आयडिया निलेश वानखेडे यश ठाकूर सागर ठाकूर शंकर मोहिते पृथ्वीराज दासार महेश पंचवार कन्नू गंगुल गणेश वालाकट्टी सागर मेका कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ संध्या संजय देठे यांनी केले तर सूत्रसंचालन आभार शुभम टेकाळे यांनी मानले मानले.

## प्रयागराज येथे होणार ऐतिहासिक,सामाजिक,अध्यात्मिक अमृत कुंभमेळा; १००८ महामंडलेश्वर स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वती महाराज यांचे प्रस्थान

शिरूर कासार । प्रतिनिधी

दर बारा वर्षांनी येणारा कुंभमेळा उत्तरप्रदेशातील त्रिवेणीसंगम,तिर्थराज प्रयाग येथे ऐतिहासिक,सामाजिक,अध्यात्मिक अमृत कुंभमेळा होत असून या कुंभ मेळाव्यासाठी श्रीक्षेत्र इंदुवासिनीदेवी,गणेशानंद गड पिंपळनेर या संस्थानचे महंत श्री.१००८ महामंडलेश्वर स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वती महाराज यांनी महामंडलेश्वर स्वामी अभेदानंद महाराज बदलापूर,ह.भ.प.भक्तीदास म.शिंदे महाराज यांच्यासह परिसरातील संत-महंत,मान्यवर व भाविकांच्या उपस्थितीमधे मोठया उत्साहात प्रस्थान झाले.

उत्तरप्रदेश मधील तीर्थराज प्रयाग येथे यावर्षीचा जागातीक स्तरावरील व ऐतिहासिक अमृत कुंभमेळा ६ डिसेंबर ते ३ फेब्रुवारी या कालावधीमधे संपन्न होत असून दि.६/१२/२०२४ रोजी महाकुंभ छावणी पुजन,दि.२२/१२/२०२४ रोजी महाकुंभ धर्मध्वज



स्थापना विधी,दि.१४/१/२०२५ रोजी प्रथम स्नान,दि.२९/१/२०२५ रोजी द्वितीय स्थान,दि.३/२/२०२५ रोजी तृतीय स्थान हा कुंभमेळा होत असून या कुंभमेळाव्यामधे श्रीक्षेत्र इंदुवासिनीदेवी,गणेशानंद गड पिंपळनेर या संस्थानचे महंत श्री.१००८ महामंडलेश्वर स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वती महाराज यांचा श्री.पंचायती महानिर्वाणी आखाडा छावणी असून स्वामीजींचे प्रस्थान झाले.गणेशानंद गड, पिंपळनेर, गोमळवाडा, रूपूर, कोळवाडा व शिरूर शहर याठिकाणी भव्यमिरवणूकीने महाराजांचे प्रस्थान झाले.भाविकांनी ठिकठिकाणी,रांगोळी काढत औक्षण करुन फुलांचा वर्षाव करत महाराजांचे स्वागत केले.यावेळी सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी महाराज यांना कुंभमेळ्यासाठी शुभेच्छा देऊन परिसरातील व जिल्हातील भाविकांनी कुंभमेळयासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

यावेळी श्री.ह.भ.प.भक्तीदास महाराज शिंदे, ह.भ.प.भगवान महाराज बारगजे, सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी, गणेशानंद महाराज आव्हाड,पिंपळनेरचे सरपंच, मिठु जायभाये,ज्ञानदेव केदार,उपसरपंच बाळु बडे,मधुकर जायभाये,निलेश उगलमुगले,राजकुमार पालवे, दशरथ खाडेकाका,श्रीम.आशा मिसाळ, कु.योगीता गवळी,सचिन जायभाये, उदधव नागरगोजे, एकनाथ महाराज केदार,विक्रम गोल्हार, संभाजी जायभाये,सावळेराम जायभाये,दादासाहेब मुरगुंड,ज्ञानोंबा काकडे,प्रकाश साळवे,अशोक डोके,सोपान गर्जे,हरिप्रसाद हारिदास,बाळासाहेब पवार,लहु सातपुते,किरण गारूडकर,मारूती कातखडे,अंकुश गवळी,जगन्नाथ बनकर,गणेश कातखडे,रामकिसन दहिफळे,अशोक बारगजे,संदीप जायभाये,विठ्ठल कोकाटे,बाळु बारगजे,शेषेराव नाना जायभाये,शिवाजी जायभाये,बाबुराव केदार,अमोल बारगजे,दत्तु देवढे,विनोद बारगजे,श्रीराम जगताप,दादा ससाने,विठ्ठल गर्जे,राजु दहिफळे,रामकिसन जायभाये,बारीकराव जायभाये आदींसह परिसरातील व तालुक्यातील भाविकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

## जनता सार्वजनिक वाचनालय कारेगाव येथे ग्रंथ प्रदर्शन उत्साहात साजरे

**पाटोदा । प्रतिनिधी**

दिनांक ३०/१२०२०२४ रोजी पाटोदा तालुक्यातील कारेगांव येथील जनता सार्वजनिक वाचनालय येथे ''वाचन संकल्प महाराष्ट्राचा'' च्या अनुषंगाने ग्रंथ प्रदर्शन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

ग्रंथ प्रदर्शनात कथा , कादंबऱ्या , महिलांसाठी पाक कृतींची पुस्तके , लहान मुलांसाठी गोष्टींची पुस्तके , व युवांसाठी स्पर्धा परीक्षांची पुस्तके या ग्रंथ प्रदर्शनात उपलब्ध करून देण्यात आली. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारेगांव येथील मुख्ध्यापकांनी व सह शिक्षकांनी मुलांना प्रदर्शनात आणून प्रदर्शनाची शोभा वाढवली. या वेळी ग्रंथालयाचे अध्यक्ष श्री सय्यद वाहेद महेबुब यांच्या परवानगीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक श्री काळे एस. व्ही. यांनी विद्यार्थ्यांसमोर व सर्व ग्रामास्तांसमोर ग्रंथांविषयी आपले मनोगत व्यक्त केले.



ग्रंथनविषयी बोलत असताना ते म्हणाले , '' जर शरीर प्रसन्न ठेवायचे असेल तर मानवाच्या जीवनात वाचन हे अत्यंत महत्त्वाचे आहे . वाचनाने विचार प्रगल्भ होऊन एक सुसंस्कारित पिढी तयार होते. वाचनामुळे व्यक्तीच्या ठाई चांगल्या वाईट गोष्टींची जान निर्माण होते.आजची बालके उद्याच्या देशाचं भविष्य असल्यामुळे बालकांना य बाल वयातच वाचनाची सवय लागणं अत्यंत गरजेचं आहे. सुसंस्कारित पिढी घडवण्यासाठी वाचन हे महत्त्वाचे आहे.'' असे मत श्री. एस. व्ही. काळे यांनी मांडले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी वाचनालयाचे अध्यक्ष श्री सय्यद वाहेद महेबुब, सचिव श्री. सय्यद निशात वाहेद व ग्रंथालयाचे सर्व कर्मचारी , पदाधिकारी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. जायभाये ए. डी. सहशिक्षक श्री. सय्यद ए. डी. , शाळेतील सर्व विद्यार्थी व गावातील नागरिक उपस्थित होते.

# जिल्ह्यात १२ जानेवारीच्या मध्यरात्रीपर्यंत मनाई आदेश जारी

**बीड । प्रतिनिधी**

मराठा, ओबीसी,धनगर समाजाचे आरक्षण मागणी अनुषगांने आंदोलने चालू आहेत तसेच आगामी कालावधीत नुतन वर्षे साजरे होणार आहे.सध्या बीड जिल्ह्यामध्ये पोलीस स्टेशन केज येथे दाखल असलेल्या गुन्हयाच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष व संघटना यांच्याकडून सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने त्यांच्या मागणी करीता अचानक आंदोलन करत आहेत. राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने त्यांच्या न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, आंदोलने, उपोषण, मोर्चे होण्याची शक्यता असून अचानक घडणारे घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आरक्षणच्या मागणीसाठी सर्व समाज व राजकीय पक्ष आक्रमक आहे या करिता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी मनाई आदेश जारी करण्यात आले असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.

दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते १२ जानेवारी २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडंबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

पान ६ वरून...

### दिंद्रूड पंचक्रोशीत ढगाळ

किडींच्या अळ्यांनी पिकांवर आक्रमण केले आहे. एवढेच नाही तर सकाळच्या वेळी पडणारे धुके देखील शेतपिकासाठी चिंताजनक असल्याचे अभ्यासु शेतकरी बाजीराव काशीद यांनी सांगितले. मागच्यावर्षी सुद्धा तूरीचे पीक फुलोऱ्यावर असताना धुके पडले होते. त्यामुळे संपूर्ण तुरीचा बहर जळून गेला होता. तुरीला खूपच विरळ शेंगा लागल्याने उत्पादन सुद्धा खूपच कमी झाले होते. यावर्षी परत तशीच परिस्थिती निर्माण झाल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

### अनुदानासाठी ७ हजार

श्री विजय चव्हाण यांच्याकडून करण्यात येत आहे. कोरड तेरा हजार रुपये मदत आहे पण हेक्टरी प्रमाणे ८० टक्के मदत मिळणार आहे.जून ते ऑक्टोबर, २०२४ माहे ऑगष्ट व सप्टें या कालावधीत अंबड तालुक्यात अतिवृष्टी/पुर यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीपोटी बाधितांना मदत देण्यासाठी प्राप्त याद्यागावाचे नाव १दहिगव्हाणखु २ पांगरी ३ वाळकेश्वर४ ढालसखेडा पाथरवाला बु.६ करण७ बोरी ८ सारगपूर ९ किनगाव१० गंगारामवाडी सुखापुरी १२ देशगव्हाण या बारा गावानंतर इतर लगेच दुसऱ्या टप्प्यामध्ये राहिलेल्या गावाचा समावेश करण्यात येईल असे मंडळ अधिकारी तलाठी यांच्याकडून सांगितल्या जात आहेत.

# मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा व तालुका संघाचे पुरस्कार जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषदेचे दिवंगत अध्यक्ष वसंतराव काणे आणि रंगा अण्णा वैद्य यांच्या नावाने देण्यात येणारया अनुक्रमे आदर्श तालुका पत्रकार संघ आणि आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कारांची एस.एम.देशमुख यांनी आज येथे घोषणा केली आहे.. अकोला जिल्हा मराठी पत्रकार संघाला २०२४ चा आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे..

पुरस्कारासाठी विविध तालुका, जिल्हा संघांकडून प्रवेशिका मागविण्यात आल्या होत्या.. त्यातून खालील तालुका संघांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे..

१) संभाजीनगर विभाग सेलू तालुका मराठी पत्रकार संघ, सेलू जिल्हा परभणी २) लातूर विभाग : उमरगा तालुका पत्रकार संघ, जिल्हा लातूर ३) कोल्हापूर विभाग : कणकवली तालुका पत्रकार संघ, कणकवली जिल्हा सिंधुदुर्ग ४) पुणे विभाग : पिंपरी - चिंचवड तालुका पत्रकार संघ, जिल्हा पुणे ५) अमरावती विभाग : खामगाव प्रेस क्लब (संलग्न मराठी पत्रकार परिषद) जि. बुलढाणा ६) नागपूर विभाग : बुटीबोरी तालुका पत्रकार संघ, जिल्हा नागपूर ७) नाशिक विभाग : शहादा तालुका पत्रकार संघ जिल्हा नंदुरबार ८) कोकण विभाग : चिपळूण तालुका पत्रकार संघ, जिल्हा रत्नागिरी..

आणि रंगा अण्णा वैद्य आदर्श जिल्हा पुरस्कारासाठी अकोला जिल्हा पत्रकार संघाची निवड करण्यात आली असल्याचे मराठी पत्रकार परिषदेच्या प्रसिध्दी पत्रकात नमुद करण्यात आलं आहे. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातील जिल्हा आणि तालुका पत्रकार संघ समाजहिताचे अनेक उपक्रम राबवत असतात, त्याचबरोबर पत्रकारांचे हक्क आणि माध्यम स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी देखील ते कायम सतर्क असतात.. अशा तालुका आणि जिल्हा पत्रकार संघांचा राज्य पातळीवर पुरस्कार देऊन गौरव करण्याचा उपक्रम मराठी पत्रकार परिषदेने १२ वर्षांपासून सुरू केलेला आहे.. पुरस्कार वितरणाचे हे सोहळे जाणीवपूर्वक राज्याच्या विविध भागात घेतले जातात.. त्यानुसार नागपूर, पाटण,कर्जत अक्कलकोट, गंगाखेड, पालघर, वडवणी, माहूर आदि ठिकाणी यापुर्वी हे कार्यक्रम पार पडलेले आहेत.. यंदाचा पुरस्कार वितरण सोहळा आणि तालुका अध्यक्षांचा मेळावा १ फेब्रुवारी २०२५ रोजी परभणी जिल्ह्यातील सेलू येथे मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. पुरस्कार विजेत्या सर्व तालुका आणि जिल्हा पत्रकार संघाचे एस.एम.देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, राज्य प्रसिध्दीप्रमूख संदीप कुलकर्णी यांनी अभिनंदन केले आहे. सर्व पुरस्कार विजेत्या संघांनी पुरस्कार वितरण सोहळयास आपल्या सर्व सदस्यांसह उपस्थित राहून आपला पुरस्कार स्वीकारावा असे आवाहन एस.एम देशमुख यांनी केले आहे.. तालुका अध्यक्ष आणि डिजिटल मिडिया परिषदेच्या पदाधिकारयांनी देखील कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## वर्धमान महावीर इंग्लीश स्कूलच्या वार्षिक स्नेह-संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

कडा । प्रतिनिधी

कडा येथील वर्धमान महावीर चॅरीटेबल ट्रस्ट संचलित महावीर इंग्लिश स्कूल या सी.बी.एस.ई. बोर्ड मान्यताप्राप्त शाळेचा उडाण -२०२४ हा १३ वा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम दिमाखात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे भुमी अभिलेख विभागाचे अप्पर आयुक्त मा.श्री.आनंद भंडारी (आय ए एस) उपस्थित होते. त्याच बरोबर



संस्थेचे अध्यक्ष- श्री अमित राठोड, उपाध्यक्ष- श्री.संदिप चानोदीया, सचिव- श्री हेमंत मेहेर ,कोषाध्यक्ष - डॉ. प्रमोद भळगट तसेच संस्थेचे इतर पदाधीकारी श्री मनिष गांधी, श्री. प्रकाश श्रीश्रीमाळ, श्री. अमोल पटवा , श्री. संजय पितळे, श्री. संतोष गांधी, सल्लागार श्री.पी.जी. मेहेर सर, मुख्याध्यापक- के.अभिलाष इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणामध्ये प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी वाचनाकडे वळले पाहिजे, सोशल मीडिया पासून दूर राहिले पाहिजे. त्याचबरोबर वक्तृत्व, खेळ, वेगवेगळ्या कला जोपासल्या पाहिजे.तरच तुम्ही जीवनामध्ये यशस्वी होऊ शकतात.अशा प्रकारे मार्गदर्शन त्यांनी उपस्थित विद्यार्थी आणि पालकांना केले.या कार्यक्रमामध्ये ''नवरस'' या संकल्पनेवर आधारीत श्रृंगार , हस्य , करुण, रौद्र, वीर, भय , बिभतस्य, अदभुत, शांत रस अशा नऊ रसावर चिमुकल्यांनी अप्रतिम असा नाट्य,नृत्य आविष्कार सादर करून प्रेक्षकांची मने जिकली,त्याचबरोबर मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र यांची रथयात्रा कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले,त्यांच्या रथ यात्रेतील प्रसंगाने साक्षात प्रभू रामचंद्रांचे दर्शन झाले.या प्रसंगाना प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. या कार्यक्रमाला कडा आणि कडा परिसरातील पालकवर्ग आणिक्ष शिक्षणप्रेमी नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी पार पडला.


Date 30 Dec.2024
Daily Loktantra
**Change of Name**
I have my name from
Old Name- Ghodke Bipinchand Bibhishanrao
(Old Name As Documents)
New Name - Ghodke Bipinchandra Bibhishanrao
(New Name As per Aadhar Card )
R/o. Loladgaon Post. Kurla
Tq&Dist.Beed.431 122

# अवकाळी आणि ढगाळ वातावरणाचा बळीराजाला फटका

## तीन जिल्ह्यात २५०० हून अधिक हेक्टरवरील पिकांचे नुकसान

राज्यात गेल्या दोन दिवसात झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा फटका शेतकऱ्याला बसला आहे. जळगाव, धुळे, सांगली या तिन्ही जिल्ह्यांत उभ्या पिकाचे नुकसान झाले असून हातातोंडाशी आलेले पीक वाया गेले आहे. यामुळे सरकारने तातडीची मदत जाहिर करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली असून तब्बल २,६०० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे.

राज्यात गेल्या दोन दिवसापासून पडणाऱ्या पावसामुळे मुळे रब्बी पिकांचे नुकसान झाले आहे. जळगाव, धुळे, सांगलीसह नाशिक जिल्ह्यात बळीराजा संकटामध्ये आला आहे. पुणे कृषी विभागाने सध्याच्या घडीला २,६०० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याची माहिती दिली आहे. तर यात वाढ होण्याचीही शक्यता व्यक्त केली आहे.

सर्वाधिक फटका जळगावमध्ये : जळगाव जिल्ह्यातील यावल आणि रावेर येथे अवकाळी झाल्याने केळी बागांचे नुकसान झाले आहे. वादळी पावसामुळे केळीचे उभ्या बागा भूई सपाट झाल्या असून उत्तर महाराष्ट्रात गव्हाचे पीक आडवे झाले आहे. अनेक ठिकाणी हरभऱ्याचे देखील नुकसान



झाल्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

धुळ्यात शेतकरी संकंटात : वादळी पावसाचा फटका धुळ्याच्या शिरपूर तालुक्यालादेखील बसला. येथे केळी, पपई, हरभरा, गहू आणि कांद्याचे नुकसान झाले आहे. यामुळे आमदार काशीराम पावरा यांनी नुकसानीची पाहणी करत कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना पंचनामे करण्याचे आदेश दिले.

जळगावात वाऱ्यासह जोरदार पाऊस : जळगाव जिल्ह्यातील रावेर, भुसावळ, यावलमध्ये सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे हरभरा, तूर आणि कापसाचे नुकसान झाले. नाशिकमध्ये १८० कोटीच नुकसान : नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी, नाशिक व येवला या तीन तालुक्यातील २३ गावांमध्ये अवकाळी पावसामुळे नुकसान झाले आहे. जिल्ह्यातील १७२ हेक्टरला फटका बसला आहे. तसेच येवला तालुक्यात पावसामुळे गहू पिकाचे मोठे नुकसान झाले असून ३ वर्षात शेतकऱ्यांचं १८० कोटीचे नुकसान झाले आहे.

सांगलीत द्राक्ष शेती संकटात : सांगली जिल्ह्यामध्ये बदलत्या हवामानामुळे द्राक्ष शेती संकटात आली असून द्राक्षबागा वाया जाण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. हवामान बदलामुळे द्राक्ष घडकुजणे रोगाचा प्रादुर्भाव वाढला असून शेतकरी बागा वाचवण्यासाठी फवारण्या करण्यात व्यस्त झाले आहेत.

धाराशिवमध्ये किड रोगांचा प्रादुर्भाव : धाराशिव जिल्ह्यात रब्बी हंगामासाठी हरभरा, ज्वारी, मका पेरण्यात आला आहे. पण अवकाळी पावसामुळे पिकांवर किड रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. तुळजापूर तालुक्यातील खरबूज फळबागांवर करप्या रोग पडत असून शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६०० : ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीची स्थापना
१७८१ : अमेरिकेमध्ये अमेरिकेची पहिली बँक ऑफ उत्तर अमेरिका उघडली.
१८०२ : इंग्रज व दुसरा बाजीराव यांच्यात वसईचा तह झाला या तहात पेशव्यांचा बराच भूभाग इंग्रजांच्या अधिपत्याखाली गेला.
१८७९ : थॉमस एडिसनने मेन्लो पार्क, न्यू जर्सी येथे प्रथमच विद्युत दिव्यांचे प्रात्यक्षिक दाखवले.
१९२९ : महात्मा गांधीआणि काँग्रेस च्या कार्यकर्त्यांनी लाहोर मध्ये पूर्ण स्वराज साठी आंदोलनाला सुरुवात केली.
१९४४ : दुसरे महायुद्ध हंगेरीने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९५५ : जनरल मोटर्स वर्षातून १ अब्ज अमेरिकन डॉलर्सची कमाई करणारी पहिली अमेरिकी कंपनी बनली.
१९९७ : मोहम्मद रफ़ीक तरार पाकिस्तान चे नववे राष्ट्रपती बनले.
१९८५ : युनायटेड किंग्डम ने युनेस्कोचे सदस्य बनले.
१९८४ : राजीव गांधी हे भारताचे सातवे प्रधान मंत्री बनले.
१९९९ : बोरिस येल्त्सिन यांनी रशियाच्या राष्ट्राध्यक्षपदाचा राजीनामा दिला.
१९९९ : पनामा कालव्यावर पनामा (देशा) चे पूर्ण नियंत्रण आले. त्याआधी काही वर्षे या कालव्यावर अमेरिका व पनामा यांचे संयुक्तपणे नियंत्रण होते.
२००४ : त्याकाळी जगात सर्वात उंच असलेल्या (१६७० फूट), तैपेइ १०१ या इमारतीचे उद्घाटन झाले.
२००८ : ईश्वरदास रोहिणी यांना दुसऱ्यांना मध्य प्रदेश च्या विधानसभेचे अध्यक्ष बनविण्याची घोषणा करण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७१ : गजानन यशवंत ताम्हणे तथा माणिकराव आधुनिक भारतीय व्यायामविद्येचे प्रवर्तक, 'कन्या आरोग्य मंदिरा'चे संस्थापक, बडोद्याचे मल्लविद्या विशारद (मृत्यू: २५ मे १९५४)
१९१० : पं. मल्लिकार्जुन मन्सूर हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, (ग्वाल्हेर घराण्याचे पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे शिष्य) नीलकंठबुवा अलुरमठ आणि (जयपूर घराण्याचे अध्वर्यू उस्ताद अल्लादियाँ खाँ यांचे पुत्र) मंजी खाँ व भुर्जी खाँ असे तीन गुरू त्यांना लाभले, पद्?मविभूषण व कालिदास सन्मान आदी मानसन्मान त्यांना मिळाले. (मृत्यू: १२ सप्टेंबर १९९२)
१९२५ : भारतीय लेखक श्री लाल शुक्ला यांचा जन्म. (मृत्यू: २८ ऑक्टोबर २०११)
१९३४ : भारतीय लेखक, कवी आणि विद्वान अमीर मुहम्मद अकरम अववान यांचा जन्म.
१९३७ : अँथनी हॉपकिन्स वेल्श अभिनेता
१९४७ : सुप्रीम कोर्टचे माजी न्यायाधीश स्वातंत्र कुमार यांचा जन्म.
१९४८ : डोना समर अमेरिकन गायिका (मृत्यू: १७ मे २०१२)
१९५१ : लोकसभेचे सदस्य अरविंद सावंत यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८६ : केंद्रीय आरोग्य मंत्री राजनारायण यांचे निधन.
१८९८ : बिहार चे माजी मुख्यमंत्री कृष्णा बल्लभ सहाय यांचा जन्म.
१९२६ : वि. का. राजवाडे इतिहासाचार्य (जन्म: १२ जुलै १८६३)
१९५६ : मध्य प्रदेश चे माजी मुख्यमंत्री यांचे निधन.
१९७१ : डॉ. विक्रम साराभाई भारतीय अवकाश संशोधन कार्यक्रमाचे शिल्पकार (जन्म: १२ ऑगस्ट १९१९)
१९९३ : जॉर्जियाचे पहिले अध्यक्ष झवेद गमझखुर्डिया यांचे निधन. (जन्म: ३१ मार्च १९३९)
१९९७ : 'स्वरराज' छोटा गंधर्व (जन्म: १० मार्च १९१८)
२००१ : भारतीय लेखक टी. एम. चिदंबरा रघुनाथन यांचे निधन.



# ऑर्किड फ्लॉवरची लागवड करेल मालामाल

ऑर्किड फ्लॉवर खूप सुंदर आहे. त्याचे स्वरूप, रंग, आकार आश्चर्यकारक आहे आणि दीर्घकाळ ताजे राहते. भारतात ऑर्किडच्या १२०० हून अधिक प्रजाती आढळतात. ऑर्किडच्या फुलांना बाजारात चांगला भाव मिळतो. अशा परिस्थितीत, जर तुम्ही त्याची लागवड केली तर हा तुमच्यासाठी खूप फायदेशीर सौदा ठरू शकतो. बदलत्या रंग आणि आकारामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही ही फुले चांगली विकली जातात. चेन्नई, कोची, बंगळुरू, मुंबई आणि पुणे यांसारख्या भारतातील मोठ्या शहरांमध्ये व्यावसायिक ऑर्किड फार्म्सची स्थापना करण्यात आली आहे, ज्यामुळे भारतात उगवलेल्या या फुलांनी आंतरराष्ट्रीय फुलांच्या बाजारपेठेत स्वत:साठी एक विशेष स्थान निर्माण केले आहे.

फुलझाडांचे व्यवस्थापन : काळी चिकणमाती माती ऑर्किड लागवडीसाठी योग्य मानली जाते. हायड्रोपोनिक्स सारख्या शास्त्रोक्त पध्दतीनेही तुम्ही त्याची लागवड करू शकता. चांगल्या फुलण्यासाठी चांगली ओलसर माती आवश्यक आहे. ऑर्किड रोपासाठी योग्य पोषण आणि पाणी आवश्यक आहे. यासाठी कुजलेल्या झाडाची साल आणि गांडुळ खताचा वापर खत म्हणून करता येतो. याशिवाय तुम्ही कॅल्शियम नायट्रेट, अमोनियम नायट्रेट आणि लोह पाण्यात विरघळवून वनस्पतींसाठी खत म्हणून वापरू शकता. ऑर्किडच्या फुलांना शिंपडण्याच्या पद्धतीने सिंचन केल्यास जास्त फायदा होतो. याला उन्हाळ्यात सकाळी आणि संध्याकाळी पाणी द्यावे लागते. हिवाळ्यात तुम्ही एकदा पाणी देऊ शकता. ऑर्किडला कमी पाणी लागते. ऑर्किड फुलांना २५ ते ३० अंश तापमान आवश्यक असते. त्याच्या फुलांच्या विकासासाठी अधिक आर्द्रता आवश्यक आहे. ऑर्किड फुलांची काढणी फक्त संध्याकाळीच करावी कारण यावेळी फुले पूर्ण बहरलेली असतात. सकाळी फुले कोमेजतात. ऑर्किडची फुले फुलल्यानंतर ३ ते ४ दिवसांनी सुकायला लागतात. त्याच्या देखभालीसाठी कोल्ड स्टोरेज आवश्यक आहे.

## चांगला नफा मिळविण्यासाठी

# पालकाची लागवड

पालकाचे बरेच प्रकार आहेत. भारतात पालकाची लागवड रब्बी, खरीप आणि उन्हाळी या तीनही पीक हंगामामध्ये केली जाते. यासाठी शेतात पाण्याचा निचरा करण्याची चांगली व्यवस्था असावी. तसेच हलक्या चिकणमाती जमिनीत पालकाच्या पानांचे चांगले उत्पादन मिळते.पेरणीपूर्वी बियाण्यास २ ग्रॅम कॅप्टन प्रति किलोग्रॅमची प्रक्रिया करावी, जेणेकरून उत्पादन चांगले मिळेल. पेरणीसाठी ओळीपासून ओळीपर्यंत २५-३० सेंमी आणि रोपापासून रोपापर्यंत ७-१० सेमी अंतर ठेवावे. पालक लागवडीसाठी, हवामान आणि मातीनुसार जास्त उत्पादन देणारे सुधारित वाण निवडू शकतात.

देशी पालकः देशी पालक बाजारात चांगल्या दराने विकला जातो. देशी पालकाची पाने लहान, गुळगुळीत आणि अंडाकृती असतात. ते खूप लवकर तयार होते, म्हणून बहुतांश शेतकरी त्याची लागवड करतात.

विलायती पालक : परदेशी पालकाच्या बिया गोल आणि काटेरी असतात. डोंगराळ आणि थंड ठिकाणी काटेरी बियाणे वाढवणे अधिक फायदेशीर आहे. मैदानी भागातही गोल जातींची लागवड केली जाते.

ऑल ग्रीन : हिरव्या पालेभाज्या पालकाची जात १५ ते २० दिवसांत तयार होते. एकदा पेरणी केल्यानंतर ते सहा ते सात वेळा पाने कापू शकते. ही वाण निःसंशयपणे जास्त उत्पादन देते, परंतु हिवाळ्यात लागवड केल्यास ७० दिवसांत बियाणे आणि पाने तयार होतात.

पुसा हरित : वर्षभराचा खप भागवण्यासाठी अनेक शेतकरी पुसा हरितची लागवड करतात. त्याची वाढ सरळ वरच्या बाजूस असते आणि त्याची पाने गडद हिरवी आणि आकाराने मोठी असतात. क्षारयुक्त जमिनीवर त्याची लागवड करण्याचे अनेक फायदे आहेत.



# हिवाळ्यात शेळ्यांची काळजी



हिवाळ्याचा काळ शेळ्यांसाठी खूप आव्हानात्मक असतो. यावेळी, त्यांच्या आरोग्याचे रक्षण करण्याची आणि थंडीपासून तणाव कमी करण्याची गरज आहे. शेळ्यांच्या आरोग्यासाठी आणि आरामासाठी योग्य काळजी, भोजन आणि व्यवस्था करावी लागते.

शेळ्यांची योग्य काळजी घेण्यासाठी चांगल्या घराची गरज असते. हिवाळ्यात, शेळ्यांना थंडीपासून संरक्षण करण्यासाठी उबदार निवारा आवश्यक असतो. त्यांच्या निवासस्थानाचे उत्तरेकडील वाऱ्याच्या प्रवाहापासून संरक्षण करणे सर्वात महत्वाचे आहे. शेळ्यांची त्वचा नैसर्गिकरित्या जाड असते, जी त्यांना थंडीशी सामना करण्यास मदत करते आणि संरक्षणात्मक कवच म्हणूनही काम करते. या जाड त्वचेमुळे शेळ्यांच्या शरीरातील हवेचा तीव्र प्रवाह कमी होतो आणि शरीरात हलका ओलावा टिकून राहतो.

अन्न आणि पेय : शेळ्यांना हिरवा चारा सोबत तेलाची पोळी, मोहरीचे तेल द्यावे. मोहरीच्या तेलामुळे शेळ्यांच्या शरीराला ऊब मिळते. याशिवाय केकसोबत अल्फा किंवा मिश्रित गवतही शेळ्यांच्या आरोग्यासाठी चांगले असते.

कोकरांची काळजी घ्या : कोकरांना जन्म देणाऱ्या शेळ्यांना हिवाळ्यात विशेष काळजी आणि निवारा आवश्यक असतो. लहान कोकरांना त्यांच्या शरीराचे तापमान उबदार ठेवण्यासाठी त्यांच्या आईची गरज असते. अशा परिस्थितीत शेळ्यांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

# गव्हाची आंतरमशागत अन् पाणी व्यवस्थापन

पाणी व्यवस्थापन : भारी जमिनीकरिता १८ दिवसांच्या अंतराने ६ पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. मध्यम जमिनीसाठी १५ दिवसाच्या अंतराने ७ पाळ्या द्याव्यात तर हलक्या जमिनीस १०-१२ दिवसाच्या अंतराने ८ ते १० पाळ्या द्याव्यात. परंतु पीक वाढीच्या महत्वाच्या अवस्था व या अवस्थेत पाण्याचा ताण पडल्यास उत्पादनावर परिणाम होतो.

मुकुटमुळे फुटण्याच्या वेळी (पेरणीनंतर २१-२५ दिवसांनी): या वेळी जमिनीत पाण्याची उपलब्धता कमी असल्यामुळे मुकुटमुळे कमी फुटतात. फुटलेल्या मुळ्या जास्त पसरत नाहीत. फुटवे कमी येतात. गहू काढणीस लवकर येतो व उत्पादनात घट येते. फुटवे फुटण्याची अवस्था (पेरणी नंतर ५५-६० दिवसांनी): ओंब्या कमी बाहेर पडतात. बाहेर पडलेल्या ओब्यांची लांबी कमी होते व पर्यायाने उत्पादनात घट येते.

पीक फुलोरयास येणे (पेरणी नंतर ७०-८०-दिवसांनी): परागसिंचन कमी होऊन दाण्याची संख्या घटते व पर्यायाने उत्पादन घटते.

दाण्यात चिक भरण्याची वेळ (पेरणीनंतर ९०-१०० दिवसांनी): या अवस्थेत दाणे पोसतात, त्यांचा आकार वाढतो. परंतु जमिनीत ओलावा कमी असल्यास दाण्याचा आकार लहान होतो व वजन कमी होते.

दाणे टणक होण्याची अवस्था (पेरणी नंतर



११० दिवसांनी): या अवस्थेत जमिनीत ओलावा कमी असल्यास दाण्याचा आकार कमी होतो.दाण्यांवर सुरकुत्या पडून प्रत निकृष्ट होते व पर्यायाने उत्पादनात घट येते. ज्या शेतकऱ्यांकडे मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध नाही अशा परिस्थितीत पाण्याचे योग्य नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे. पाणी अपुरे असल्यास व एक ते पाच पाण्याच्या पाळ्या देणे शक्य असल्यास पुढील प्रमाणे पाणी द्यावे. चार पाणी देणे शक्य असल्यास पहिले पाणी २१ ते २५ दिवसांनी, दुसरे ५५-६० दिवसांनी तर तिसरे ७०-८० दिवसांनी दयावे तर चौथे पाणी ९०-१०० दिवसांनी द्यावे.

आंतरमशागत : पेरणी नंतर २१-३० दिवसांनी एक खुरपणी आणि कोळपणी करून तणांचा बंदोबस्त करावा. गव्हात चांदवेल, हरळी यासारख्या तणांचा प्रादुर्भाव होतो, त्याकरिता जरुरी प्रमाणे एक किंवा दोन खुरपणी, तसेच कोळपणी करून जमीन मोकळी करावी. गहू पिकातील अरुंद पानांचे आणि रुंद पानांच्या तण नियंत्रणासाठी पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी दर हेक्टरी आयसोप्रोटयुरॉन (५०%) दोन ते तीन किलो किंवा मेटासल्फूरॉन मेथाईल (२०%) हेक्टरी २० ग्रॅम किंवा २,४-डी (सोडियम) अधिक २% युरिया ६०० ते १२५० ग्रॅम ६०० ते ८०० लिटर पाण्यातून मिसळून गव्हाच्या दोन ओळीत फवारावे. तणनाशक फवारल्या नंतर १० ते १२ दिवस पाणी देवू नये. तणनाशकाच्या फवारणीसाठी फ्लॅटफॅन किंवा फ्लडजेट नोझल वापरावे.तसेच फवारणीसाठी साधा नॅपसॅक पंप वापरावा.

पॉवर स्प्रे वापरू नये. बागायती वेळेवर पेरलेल्या गव्हास खुरपणी झाल्यानंतर (सर्वसाधारणपणे २१-३० दिवसांनी) प्रती हेक्टरी ६० किलो नत्र (१३० किलो युरिया), बागायती उशिरा पेरलेल्या गव्हास प्रती हेक्टरी ४० किलो नत्र (८७ किलो युरिया) द्यावा. पीक ५५ ते ७० दिवसांचे असताना १९:१९:१९ या विद्राव्य खताची दोन वेळा फवारणी करावी. (१० लिटर पाण्यात ५० ग्रॅम १९:१९:१९) दाणे भरण्याच्या अवस्थेत दोन टक्के युरियाची फवारणी करावी. (१०लि. पाण्यात २०० ग्रॅम युरिया).

# संतोष देशमुख हत्या ही राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारी घटना-ना.रामदास आठवले

केज। प्रतिनिधी

संतोष देशमुख यांची हत्या ही महाराष्ट्रासारख्या पुरोगामी समाजाला राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारे घटना असून या हत्याकांड आणि खंडणी प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी. तसेच या प्रकरणाचा तपास जलद गतीने करण्यात यावा. यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्र्याची देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन प्रसार माध्यमाशी बोलताना सांगितले. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दि. ३० डिसेंबर रोजी मस्साजोग येथे सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेवून सांत्वन केले. यावेळी त्यांच्या सोबत युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, बाबुराव कदम, मिलिंद शेळके, दीपक कांबळे यांच्यासह रिपाईचे नेते उपस्थित होते.





बीड जिल्ह्यातील मस्साजोग तालुका केज येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या ही पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारी आहे तसेच यां घटनेपूर्वी पवन ऊर्जा प्रकल्पात घडलेल्या घटनेची येथील सुरक्षारक्षाच्या मारहाणीची प्रकरणी पोलिसांनी ॲट्रॉसिटीची तक्रार दाखल करून घेतली असती तर कदाचित ही घटना टाळता आली असती म्हणून जिल्ह्यात आणि राज्यात पोलिसांच्या कार्यपद्धतीवर रोष व्यक्त होत आहे. या घटनेतील गुन्हेगारांची प्रॉपर्टी जप्त करून भागणार नाही तर यातील आरोपींना पकडणे आवश्यक आहे. चार आरोपी पकडले असून अद्यापही तीन आरोपी फरार आहेत. इतर आरोपी ताब्यात घ्यायला एवढा वेळ लागतो ? महाराष्ट्र पोलीसासाठी ही चांगली नाही पोलिसांनी दवाखाली काम करू नये. हे जे प्रकरण आहे ते अत्यंत गंभीर आहे. सुरक्षा रक्षक अशोक सोनवणे हा सोलार प्रकल्पात काम करीत होते त्यांना मारहाण झाल्यामुळे संतोष देशमुख हे भांडण सोडवायला गेले होते. त्यामध्ये ॲट्रॉसिटी लावणे अत्यंत आवश्यक होते. जर ॲट्रॉसिटी लावली असती आणि आरोपींना पकडले असते तर ही घटनाच घडली नसती. यामुळे पोलीसावर लोकांचा संशय आहे. हे अत्यंत गंभीर आहे. केज आणि बीड येथील पोलिसांवर लोकांचा संशय आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकांची बदली झालेली आहे. नवीन आलेल्या जिल्हा पोलीस अधीक्षकांनी यात लक्ष घालावे. यासंदर्भात मी या सदर्भात मी त्यांच्याशी बोलणार आहे. असे रामदास आठवले म्हणाले.

तसेच मुख्यमंत्र्यांशी देखील ते बोलणार आहेत. देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळाला पाहिजे. संतोष देशमुख यांची आई आणि त्यांच्या कुटुंबीयांची त्यांनी भेट घेतले आहे. या कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे अशी त्यांची आणि रिपब्लिकन पार्टीची मागणी आहे. असे तेंमहबके. तर या प्रकरणी ते केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा यांची देखील भेट घेणार आहेत. परंतु त्या अगोदर ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेणार आहे. या प्रकरणातील सर्व आरोपी आणि त्यांचे मास्टरमइंड यांना तात्काळ अटक झाली पाहिजे. ही घटना घडवून २१ दिवस लोटले आहेत. तरी अद्याप पर्यंत सर्व आरोपी अटक झालेले नाहीत. हे आश्चर्य आहे. अद्याप पर्यंत पोलिसांनी देशमुख यांच्या कुटुंबीयातील कोणाचेही स्टेटमेंट घेतलेले नाही. घटना घडल्या नंतर पहिल्या दोन-तीन दिवसांमध्ये पोलिसांनी त्यांचे स्टेटमेंट घेणे आवश्यक होते. अशा प्रकरणांमध्ये त्या कुटुंबाचे लवकरात लवकर स्टेटमेंट घेतले जातात पण पोलिसांनी त्यांचे लवकरात लवकर विनाविलंब स्टेटमेंट घ्यावे. या प्रकरणाची सविस्तर चौकशी करून उर्वरित सर्व आरोपी यांना तात्काळ ताब्यात घेण्यात यावे. त्या आरोपींना पकडलेच पाहिजे अशी आमची भूमिका असून सर्व आरोपी आणि त्याचा सूत्रधार यांच्या अटकेची मागणी रामदास आठवले यांनी केली आहे. यावेळी त्यांच्या सोबत राजू जोगदंड,दिपक कांबळे, महावीर सोनवणे, अशोक साळवे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे, किसन तांगडे, मझर खान, सुरेश माने, रविराज माळाळे, मायाताई मिसळे, राणी गायकवाड, गोवरर्धन वाघमारे, उत्तम आप्पा मस्के, बापू पवार, सादेक कुरेशी, भाई उजगरे, महादेव उजगरे, अरुण निकाळजे, अरुण भालेराव, दीपक कांबळे, धोंडीराम सिरसट, प्रमोद दासुद, सुभाष तांगडे, संदीपान डोंगरे, राहुल सरवदे, अविनाश जोगदंड, सतीश शिनगारे, प्रभाकर चांदणे, विलास जोगदंड, शाम विर, नागेश दुबळे, भाऊसाहेब दळवी, रतन वाघमारे, संभाजी गायकवाड, ईश्वर सोनवणे, निलेश ढोबळे, राजेश सोनवणे, अक्षय कोकाटे, धम्मा पारवेकर आणि दिलीप बनसोडे, रवी जोगदंड, गौतम बचुटे, सूरज काळे, हरेंद्र तूपारे, प्रशांत हजारे, हरीश गायकवाड, दादाराव धेंडे, विनोद शिंदे, रोहित कांबळे, रोहित बचुटे आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी लढणारी संघटना म्हणजे मुप्टा - प्रो.डॉ.सरवदे

### राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा

बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्रातील प्रामुख्याने मराठवाड्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करून शिक्षकांना न्याय मिळवून देणारी एकमेव संघटना म्हणजे 'महाराष्ट्र अंडर प्रिव्हिलेज्ड टिचर्स असोसिएशन' अर्थात 'मुप्टा', असे प्रतिपादन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र.कुलगुरू प्रो.डॉ.वाल्मिक सरवदे यांनी व्यक्त केले. बीड जिल्हा अंडर प्रिव्हिलेज्ड टीचर्स असोसिएशनच्या (मुप्टा) वतीने आयोजित क्रांतीबा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा प्रसंगी ते बोलत होते. बीड जिल्हा अंडर प्रिव्हिलेज्ड टीचर्स असोसिएशनच्या (मुप्टा) वतीने शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे शिक्षकांचा सन्मान क्रांतीबा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त दरवर्षी केला जातो. याही वर्षी रविवार २९ डिसेंबर २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड. येथे ( वर्ष १६ वे ) क्रांतीबा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.प्रदीप रोडे, (राज्याध्यक्ष,मेटा ),तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रो.डॉ.वाल्मिक सरवदे (प्र.कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर.), अँड.प्रा.जयमंगल धनराज ( मा.प्राचार्य, डॉ.बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज, मुंबई), प्रा.सुनील मगरे (मुप्टा संस्थापक सचिव),मा.केशव जोंधळे (राज्य सचिव,मेटा. ), यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व पुरस्कार्थी उपस्थित होते.



आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण प्रो.डॉ.वाल्मिक सरवदे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रा.डॉ. प्रतिभा जाधव (आर्ट्स,कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, लासलगाव,जिल्हा नाशिक.) प्राचार्य भास्कर पाटील ( सुधाकरराव नाईक महाविद्यालय, अकोला.) श्रीमती कीर्तीताई श्रीधरराव पांगरकर (साळुंके), (विनायक प्राथमिक विद्यालय, बीड.) आयु. राहुल कांबळे (युसुफ वडगाव हायस्कूल, युसुफ वडगाव, ता. केज जि. बीड.) आयु. जालिंदर ठवरे (जि. प. प्राथमिक शाळा,रेवकी ता.गेवराई जि. बीड.) आयु. संजय सोनकांबळे (लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतुर, जि. जालना.) प्राचार्य,डॉ.संघमित्रा गोणारकर (सावित्रीबाई फुले महिला बी.एड. कॉलेज,नांदेड.) श्रीमती भावसार अश्विनी रामराव ( जि. प. प्राथमिक शाळा वाणीसंगम, जि. परभणी.) आयु. वडमारे सचिन (भगवान विद्यालय,बीड.) आयु. गायकवाड दादासाहेब (विवेकानंद विद्यालय,केज. जि. बीड.) आयु. शामसुंदर बगाटे (जि. प. प्राथमिक शाळा,लोणी, जि. परभणी.) आयु.रामचंद्र सीताराम कसबे ( राजस्थानी विद्यालय, बीड.) श्रीमती रेणुका मुक्ताराम दोडके (जि. प. प्राथमिक शाळा, थेरला, ता. पाटोदा जि. बीड.) प्रा.डॉ.अनिता शिंदे ( सौ.के. एस. के. महाविद्यालय, बीड.)आयु.गणेश मैंद, (विद्यानिकेतन माध्यमिक विद्यालय, जोडबोड सर, जि.छ. संभाजीनगर.) हेमलता सुनील गजबे ( एम.एस.सी. नर्सिंग कॉलेज, जे.जे.हॉस्पिटल, मुंबई.),प्राचार्य रघुनाथ चौधरी (राष्ट्रीय कन्या कनिष्ठ महाविद्यालयीन, बीड) या शिक्षकांचा स्मुर्तीचन्ह व सन्मानपत्र देऊन त्यांच्या कुटुंबासह गौरव करण्यात आला. याप्रसंगी आपले विचार व्यक्त करतांना प्रा.सुनील मागरे यांनी "कौन क्यों चला गया ये जरूरी नहीं, क्या सीखा कर गया ये जरूरी है" तीस वर्षाच्या संघर्षमय प्रवासामध्ये संघटनेचं काम करत असतांना एक सोडून जर दूर गेला तर दहा माणसं जोडण्याचं काम या मुप्टा संघटनेन केल, अनेक जातिधर्मातले शिक्षक संघटनेमध्ये जोडले गेले म्हणून नागसेन वणाच्या मातीमध्ये शून्यातून चालू केलेलं हे छोटस रोपटं आता वटवृक्ष बनतय याचा मला सार्थ अभिमान आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अँड.प्रा.जयमंगल धनराज यांनी क्रांतीबा जोतिबा फुले हे बहुजन समाजाचे प्रतिनिधीत्व करणारे, बहुजन समाजाला विकासाच्या मुख्य धारेत आणणारे पहिले नेते होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांना गुरुस्थानी मानत त्यांचे कार्य महान आहे, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे यांनी यावेळी बोलतांना म्हणाले की, हजारो शिक्षकांचे प्रश्न मुप्टा संघटनेच्या माध्यमातून सुटलेले आहेत. संघर्ष भूतकाळात होता वर्तमानकाळातही आहे आणि भविष्यकाळातही राहणार आहे पण संघर्षातून काही घडत, यशस्वी व्हायचे असेल तर सर्व शिक्षकांनी एकत्र येणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त केले. याप्रसंगी पुरस्कार्थींनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. नामदेव शिनगारे यांनी, तर सूत्रसंचलन प्रो.डॉ.मनोहर सिरसाट यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रवीण तरकसे यांनी मानले. या कार्यक्रमास मुप्टा संघटनेचे विविध पदाधिकारी, विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा ग्रंथालय कार्यालयात ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन

बीड। प्रतिनिधी

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमानिमित्त जिल्हा ग्रंथालय कार्यालयात दि. ३० व ३१ डिसेंबर, २०२४ रोजी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील ६२५ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये विद्यालयीन व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम दि. १ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत राबविला जाणार आहे.

यामध्ये जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, चंदन लॉज नगर रोड बीड अंतर्गत आकाशकन्या प्रशाला परभणीच्या विद्यार्थ्यांची परभणी येथील गणेश वाचनालयास भेट व विविध कार्यक्रम राबविले जाणार आहेत तसेच सामूहिक वाचन, वाचन कौशल्य, कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तकत्र परीक्षण व कथन स्पर्धा, ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले जाणार आहे. यानिमित्त विद्यार्थ्यांची सभासद नोंदणी मोहीम राबविली जाणार असून ग्रंथ प्रदर्शन आयोजित केले आहे. बीड शहरातील विद्यालये, महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांनी, पालकांनी व वाचकप्रेमींनी उपक्रमात सहभागी होण्यासाठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के यांनी केले आहे.



**लुखेगाव : येथील सरपंच नाशेर खान पठाण यांनी २३ डिसेंबर ते २७ डिसेंबर या ५ दिवसीय त्रिपुरा येथे महाराष्ट्र शासनाच्यावतीने अभ्यास दौरा पूर्ण केला. य बद्दल दि ३० डिसेंबर सोमवार रोजी सत्कार करून शुभेच्छा देताना, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नितीनदादा नाईकनवरे, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. बी.एल.डक, माजी नगरसेवक विनायक रत्नपारखी,भाजप सोशल मीडियाचे दत्ता महाजन.**

## धारूर शहरात सुरक्षेच्या दृष्टीने बसवलेला तिसरा डोळा निकामी

### सीसीटीव्ही कॅमेरे तात्काळ सुरु करण्याची मागणी

धारूर। प्रतिनिधी

धारूर शहरात सुरक्षीतते साठी बसवलेले सीटीव्ही कॅमेरेहे अनेक दिवसा पासुन बंद आहेत ते तात्काळ सुरू करावेत आशी मागणी नगरपरीषद व पोलीस स्टेशनला निवेदना द्वारे युवक ककार्यकर्त्यानी केली आहे.

ऐतिहासिक किल्ले धारूर शहरातील सार्वजनिक ठिकाणचे छ. शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छ.संभाजी महाराज चौक या व इतर सार्वजनिक ठिकाणी नगरपरिषद अंतर्गत काही दिवसापूर्वी लाखो रुपये खर्च करून नगरपरिषदने सीटीव्ही कॅमेरे लावले होते बऱ्याच दिवसापासून बंद पडलेल्या कॅमेऱ्या कडे पलिसेकने दुर्लक्ष केले होते शहरात सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे कॅमेरे दुरुस्त करून बसवण्याची मागणी केली आहे तर ते सध्या बंद आहेत सध्या काही चोरीच्या घटना, बे शिस्त वाहनाची ट्राफिक, मुलींची छेडछाड , व आशा



अनेक घटना वारंवार दिवसें दिवस वाढ होत असल्याने व त्यावर आळा घालण्यासाठी तात्काळ बंद असलेले कॅमेरे चालू करण्यासाठी नगरपरिषदेस व पोलीस प्रशासनास निवेदन देऊन तात्काळ कॅमेरे चालू करा अशी मागणी प्रशासनास केली, यावेळी सामाजिक कार्यकर्ते आक्षय अंधारे, पत्रकार रोहित फावडे,माऊली औताडे, अनिल धाकतोडे, अक्षय डोंगरे आदीनी केली आहे

## वसंतदादा पाटील महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा



पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २६ डिसेंबर रोजी स्पर्धा परीक्षा उत्साहात संपन्न झाली. महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कक्ष, सांस्कृतिक विभाग व विद्यार्थी विकास मंडळाच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सामान्य ज्ञानावर आयोजित या स्पर्धा परीक्षेत एकूण १०९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या परीक्षेस उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड यांनी भेट देऊन अवलोकन केले. परीक्षेच्या यशस्वी आयोजनासाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कक्षाचे अध्यक्ष डॉ. कल्याण घोडके, प्रा. गणेश देशमाने, प्रा. रुपेश कोकाटे, डॉ. दिलीप गिऱ्हे, प्रा. शेख समद, प्रा. सतिष कदम, प्रा. सखाराम गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.


**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अंबड, जि. जालना**

**कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक: ०२४८३-२७५०२६,जा.क्र.२०२४/ सेतु/कावि-१७१०**

Email ID : tahsildarambad@gmail.com दिनांक:-२६/१२/२०२४

**सईदाबेगम युसुफ सय्यद रा. पराडा**

**विरुध्द**

**ग्रामपंचायत कार्यालय/नगर परिषद पराडा ता. अंबड**

विषय :- कलम १३(३) जन्म मृत्यू नोंदणी कायदा प्रमाणे जन्म-मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत तलाठी/ग्रामसेवक मधील जाहीर प्रगटन करणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार नं.१. नामे सईदाबेगम युसुफ सय्यद रा. पराडा ता.अंबड जि. जालना येथील रहिवाशी असून अर्जदार यांनी त्यांच्या सासरे नामे माझे सय्यद अमिरमियॉ सय्यद यासीन यांची त्यांनी मृत्यूची यांची मृत्यू दि.०१/१२/१९८३ रोजी पराडा असल्याचे अर्जात नमूद केले असुन त्या अनुशांगाने त्यांनी मृत्यू प्रमाणपत्र आदेश मिळण्यासाठी त्यांनी या न्यायालयात / अर्ज दाखल केला आहे. तसेच अर्जदार नं.२. सईदाबेगम युसुफ सय्यद रा. पराडा ता. अंबड जि. जालना येथील राहिवाशी असुन अर्जदार यांनी त्यांच्या चुलते/चुलत सासरे नामे माझे सय्यद हनिफमियॉ सय्यद यासीन यांची त्यांनी मृत्यूची यांची मृत्यु दि.३१/०५/१९७४ रोजी पराडा येथे असल्याचे अर्जात नमूद केले केले असुन त्या अनुशंगाने त्यांनी मृत्यू प्रमाणपत्र आदेश मिळण्यासाठी त्यांनी या न्यायालयात/अर्ज दाखल केला आहे.त्या अर्थी, सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते कि, जन्म/मृत्यू नोंद बाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत लेखी स्वरूपात अक्षेप सादर करावा जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही तर संबधित प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल यानी नोंद घ्यावी.

आज दि.२६/१२/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले जाते.

स्वाक्षरित

**तहसिलदार अंबड**


## गुन्हेगारांचे शस्त्र परवाने तातडीने रद्द करा

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर खेळणीतील पिस्तूलाने टिकल्या उडवत लक्ष्यवेधी आंदोलन

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात जानेवारी २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या गेल्या ११ महिन्यात ४० खुन,खुन करण्याचा प्रयत्न केल्याच्या १७८ तसेच गर्दी करून मारामारी करणे, दंगल घडवणे यासारखे ४९८ गुन्हे तसेच बीड जिल्ह्यातील महिला व मुली सुरक्षित नसुन १६६ अत्याचाराच्या घटना तर विनयभंग, छेडछाडीच्या ४१३ घटना घडल्याची पोलिस दरबारी नोंद आहे.तत्कालीन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी कमीत कमी २ आणि जास्तीत जास्त १६ गुन्हे दाखल असलेल्या २४५ जणांची जिल्हा विशेष शाखेकडून माहिती घेऊन जिल्हाधिका-यांना परवाना रद्द करण्याची शिफारस केली होती.



जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी वाळुमाफिया, अपहरण,खुन, खंडणी,मटका बहाद्दर, गोळीबार या सारखे गंभीर गुन्ह्यांची शासन दरबारी नोंद असलेल्या शस्त्र परवाना धारकांचे परवाने रद्द करण्यात यावेत आणि याप्रकरणी गांभीर्य नसलेल्या जिल्हा प्रशासनाच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.३० सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर खेळणीतील पिस्तूलाने टिकल्या उडवत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदन देण्यात आले यावेळी आंदोलनात रामधन जमाले (इंटक) बीड जिल्हाध्यक्ष,माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आप, नितिन सोनावणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना,शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, शेख मुस्ताक,आदी सहभागी होते.तसेच सायं दैनिक अभिमानचे संपादक राजेंद्रकुमार होळकर, दैनिक पाटोदा संचारचे संपादक विलास डोळे, मराठी पत्रकार परीषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांच्या निवेदनावर स्वाक्षरी आहेत. बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडली असुन सामान्यांसह महिला असुरक्षित आहेत.२०२३ च्या तुलनेत यावर्षी १ हजार १४७ गुन्ह्यांची वाढ झाली आहे. आठवड्याला एक खुन तर दोन दिवसाला खुनाचा प्रयत्न अन अत्याचार होतोय.गेल्यावर्षी २०२३ मध्ये ११ महिन्यात ६२ खुन तर यावर्षी २०२४ मध्ये ४० खुनांची नोंद, २०२३ मध्ये १७८ खुनांचा प्रयत्न तर २०२४ मध्ये १७८ खुनाच्या प्रयत्न घटनांची नोंद आहे.२०२३ मध्ये अत्याचाराचे १५७ गुन्हे दाखल होते तर २०२४ मध्ये १६६ गुन्हे दाखल आहेत.विनयभंगाच्या गुन्ह्याबाबत २०२३ मध्ये ४०५ गुन्हे दाखल होते तर २०२४ मध्ये ४१३ एवढे गुन्हे दाखल आहेत. गर्दी आणि मारामारीच्या घटना २०२३ मध्ये ३९१ तर २०२४ मध्ये ११ महिन्यात ४६४ गुन्ह्यांची नोंद पोलिस ठाण्यात आहे.

# आरोग्य सेविकांना नियुक्त्या देण्यासाठी बेमुदत धरणे आंदोलन

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेअंतर्गत घेतलेल्या सरळ सेवा भरती २०२३ मधील आरोग्य सेविका यांना अद्याप नियुक्त देण्यात आल्या नाहीत. या नियुक्त्या तात्काळ देऊन उमेदवारांची आर्थिक व मानसिक कुचंबणा थांबवावी अशी मागणी राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचे प्रदेशाध्यक्षा पल्लवी चौधरी व महासचिव अविनाश शेंडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केलेली आहे. या संदर्भात नियुक्त्यां न मिळाल्याने सोमवारपासून जिल्हा परिषदेसमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू आहे.




## सरळ सेवा भरती २०२३ मधील नियुक्त्या रखडल्या

यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात संघटनेने म्हटले आहे की सरळ सेवा भरती अंतर्गत सन २०२३ मध्ये परीक्षा झाल्यानंतर या नियुक्ती अद्यापही देण्यात आल्या नाहीत. त्यामुळे ज्यांची निवड झाली त्या महिला कर्मचाऱ्यांची तर कुचंबणा होतच आहे. याशिवाय जिल्ह्यातील आरोग्य ही धोक्यात येत आहे. जाणीवपूर्वक नियुक्तया न देणाऱ्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करून नियुक्तया त्वरित द्याव्यात अशी मागणी संघटनेने केली आहे. यासंदर्भात यापूर्वीही आंदोलन करण्यात आले होते .मात्र याची दखल घेण्यात आली नाही. दि. १७ डिसेंबर रोजी निवेदन देऊन नियुक्तया आठ दिवसात दिल्या नाही तर बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता. या संदर्भात शासनाने स्पष्ट आदेश देऊनही या नियुक्त्या एक वर्षापासून दिल्या गेल्या नाहीत. ही गंभीर बाब असून शासनाच्या आदेशाची पायमल्ली आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करून नियुक्त द्याव्यात. जोपर्यंत नियुक्तया दिल्या जात नाहीत तोपर्यंत बेमुदत धरणे आंदोलन चालूच राहील. असा इशारा संघटनेच्या वतीने प्रदेशाध्यक्ष पल्लवी चौधरी, राज्य महासचिव अविनाश शेंडे यांच्यासह उमेदवारांनी दिला आहे.

# सज्जावर न राहणाऱ्या तलाठी मंडळ, अधिकाऱ्यांचे निलंबन करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करा- ॲड. भाई नारायण गोले

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील तलाठी, मंडळ अधिकारी हे सज्जा वर न राहता घर भाडे उचलून शासनाची फसवणूक करत आहेत याशिवाय माजलगाव शहरात खाजगी कार्यालये थाटून बेकायदेशीर वसुलीसाठी खाजगी व्यक्तीची नेमणूक करून जुगार अड्डया प्रमाणे अड्डे चालवत आहेत, ही बाब तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी हे जाणीवपूर्वक दुर्लक्षित करीत असून शासनाने वाटते खर्च करून प्रत्येक सज्जाला बांधलेली तलाठी, मंडळ अधिकारी कार्यालय हे जुगाराचे अड्डे अनं शोभेची वस्तू बनत चालले असून हजारो शेतकऱ्यांना किरकोळ कामासाठी माजलगाव शहरातील गल्लीबोळात हिंडून चपला झिजवाव्या लागतात, तसेच खाजगी व्यक्ती करवी बेसुमार पैसे घेऊन शेतकऱ्याची लूट तलाठी मंडळ अधिकारी करत असताना वरिष्ठ अधिकारी




तलाठी, मंडळ अधिकारी त्यांना पाठीशी घालत आहेत ही बाब निंदनीय असून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक शेतकरी कामगार पक्ष कदापिही सहन करणार नाही करिता शासना सह शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या तलाठी, मंडळ अधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत अन्यथा १३ जानेवारी पासून शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते राज्य मध्यवर्ती समिती सदस्य भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी निवेदनाद्वारे तहसीलदार यांना दिला असून निवेदनावर ॲड सय्यद याकुब, श्रीराम शेवाळे, भाई मुंजा पांचाळ, भाई राहुल सोळंके, भाई अशोक कुलकर्णी, भाई चांगदेव शेजुळ,भाई सतीश शेजुळ,भाई राधाकृष्ण पांचाळ, भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, भाई विष्णू शेळके, भाई भास्कर कांबळे, श्रीराम कोरडे, संभाजी चव्हाण, राजेभाऊ घोडके, भाई साळूजी हांडे आदींच्या स्वाक्षरी आहेत

# वाल्मीक कराड यांच्यावरील खोटे गुन्हे मागे घ्या

## मयुरी बांगर यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर समर्थनासाठी आमरण उपोषण

बीड । प्रतिनिधी

वाल्मीक कराड यांच्यावरील खोटे गुन्हे मागे घ्यावेत आणि पुरावे नसताना त्यांच्यावर जी सोशल मीडियावर चिखलफेक चालू आहे. अशा चिखल फेक करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी या मागणीसाठी मयुरी विजयसिंह बांगर यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

यावेळी मयुरी बांगर यांनी म्हटले आहे की कुठलेही पुरावे नसताना वाल्मीक कराड यांच्यावर सोशल मीडियातुन चिखल फेक केली जात आहे.निरनिराळे व्हिडिओ पोस्ट केले जात आहेत.ही चिखल फेक प्रशासनाने थांबवून दोशींवर कठोर कारवाई करावी. याबरोबरच कायदेशीर पुरावे नसतानाही वाल्मीक कराड यांच्यावर जे खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.ते मागे घ्यावेत यासाठी मयुरी बांगर यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. बांगर यांच्या मते वाल्मीक कराड यांचा स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या प्रकरणाशी कसलाही संबंध नाही. खंडणी प्रकरणांमध्ये पोलीस तपास चालू आहे .अजूनही पोलीस निष्कर्षाला आले नाहीत .तरीही वाल्मीक कराड यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून सोशल मीडियावर त्यांच्यावर चिखलफेक केली जात आहे .त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत. हे गुन्हे मागे घ्यावेत आणि चिखल फेक करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी या मागणीसाठी मयुरी बांगर यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अमरण उपोषण सुरू केले आहे.




### कोण आहेत या मयूरी बांगर

मयुरी विजयसिंह बांगर पाटोदा येथील सहकार महर्षी रामकृष्ण बांगर यांच्या स्नुषा आहेत मागील काळामध्ये बांगर परिवाराला जो त्रास झाला.एवढे असूनही मयुरी बांगर नेमक्या वाल्मीक कराड यांच्या समर्थनार्थ कशा काय पुढे आल्या या बाबत आश्चर्य व्यक्त होत आहे. वाल्मीक कराड यांनीच खोटे गुन्हे दाखल करून बांगर परीवाराला त्रास दिल्याचे बोलले जात आहे.

# दिंद्रूड पंचक्रोशीत ढगाळ वातावरणामुळे हरभरा व तुरीवर अळींचा प्रादुर्भाव

दिंद्रुड । प्रतिनिधी

मागील चार पाच दिवसांपासून पंचक्रोशीत ढगाळ वातावरणामुळे तूर आणि हरभरा पिकांवर विविध किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. या रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कीटनाशकांची फवारणी करावी लागत आहे. मात्र महागड्या औषधांचा आर्थिक भुर्दंड शेतकऱ्यांना सोसावा लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडली आहे.

याबाबत अधिक वृत्त असे की, मागच्या चार पाच दिवसांपासून पंचक्रोशीसह माजलगाव तालुक्यात ढगाळ वातावरण आहे. काही ठिकाणी हलक्या सरी पडल्या असून पावसाचा शिडकावा झाला आहे.



त्यामळे तुर, हरभरा, कापूस व भाजीपाला पिके धोक्यात सापडली आहेत. हवामान बदलामुळे पिकांवर अळीचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांसमोर नवीन संकट उभे राहिले आहे. त्यामुळे साहजिकच शेतकरी हवालदिल झाला आहे. पंचक्रोशीत मोठ्या प्रमाणात तूर, कापूस, हरभरा, ज्वारी, गहू, कांदा अशी रब्बी पिके जास्त प्रामणात घेतली जातात. सध्या तुरीला फुलोरा आला आहे तर काही ठिकाणी शेंगा भरत आहेत. हरभरा सुद्धा फुले व घाटे लागण्याच्या अवस्थेत आहे. मात्र निरनिराळ्या

◀◀ पान ३ वर

### असे करावे कीड नियंत्रण

घाटे अळीच्या प्रभावी नियंत्रणासाठी एच.ए.एन.पी.व्ही विषाणूजन्य कीटकनाशकाचा वापर शिफारसीनुसार करावा. प्रथम व द्वितीय अवस्थेतील अळ्यांचे नियंत्रण काळजीपूर्वक करावे. क्लोरअँट्रानिलीप्रोल (२० एससी) २.५ मिली किंवा इमामेक्टीन बेंझोएट (५ टक्के पाण्यात मिसळणारे दाणेदार) ३ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच सुरवातीच्या काळात ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी फायदेशीर आढळून आली आहे.

– शांतलिंग लामतूरे (कृषी सहाय्यक)

# गहिनीनाथ यात्रा महोत्सवानिमित्त रुई येथे जंगी कुस्त्यांची दंगल

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील रुई (पिंपळा) या गावांमध्ये प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्री. गहिनीनाथ यात्रा महोत्सव-२०२५ चे आयोजन रुई (पिंपळा)ग्रामस्थ मंडळ व तरुण मित्र मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,रुई-पिंपळा येथे,श्री.गहिनीनाथ यात्रा महोत्सव निमित्त नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत पहिल्याच दिवशी दि.१ जानेवारी २०२५ बुधवार रोजी सायं.०७ वा. गावामध्ये भव्य अशी संदल मिरवणुकीचे आयोजन केले व दि.०२ जानेवारी २०२५ गुरूवार रोजी ताजी यात्रा व लोकनाट्य (तमाशा) तर मुख्य आकर्षण असणार जंगी कुस्त्याचा कार्यक्रम दि.०३ जानेवारी २०२५ शुक्रवार रोजी आयोजित करण्यात आलेला आहे शेवटची कुस्तीचे बक्षीस ५००१ रु. आहे तरी



**पंचक्रोशीतील नागरिकांनी यात्रा महोत्सवातील कार्यक्रमाचा आनंद घ्यावा- संरपच ॲड.आंधळे**

मोठ्या संख्येने पैलवानानी कुस्त्याच्या दंगल मध्ये सहभाग घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी तसेच पंचक्रोशीतील नागरिकांनी यात्रेतील कार्यक्रमाचा व कुस्त्यांचा आनंद घ्यावा असे आव्हान समस्त ग्रामस्थ मंडळ व तरुण मित्र मंडळ रुई (पिंपळा) यांनी केले आहे.

# पद्मश्री शंकरबापूजी धृपद गौरव पुरस्कार सोहळ्याचे अंबाजोगाईत ३ जानेवारी रोजी आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तपस्वी पखावज साधक पद्मश्री शंकरबापू आपेगावकर यांच्या २१ व्या पुण्यस्मरणानिमित्त पद्मश्री शंकरबापूजी धृपद गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन अंबाजोगाईत ३ जानेवारी रोजी करण्यात आले आहे. यावर्षीच्या पुरस्काराचे मानकरी हे सुप्रसिद्ध धृपद गायक उस्ताद अनिसोद्दिन डागर आणि उस्ताद नफिसोद्दिन डागर जयपूर (राजस्थान) हे आहेत. यावेळी आयोजित संगीत सभेत धृपद गायन जुगलबंदी रंगणार आहे. त्यांना पंडित उद्धव बापू आपेगावकर यांची साथसंगत लाभणार आहे. अशी माहिती आपेगावकर परिवार यांच्या वतीने देण्यात आली आहे.

शहरातील हॉटेल ईट एँड स्टे हॉल, बडोदा बँकेच्या वर, मोंढा रोड, अंबाजोगाई येथे शुक्रवार, दि.३ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता पद्मश्री शंकरबापूजी धृपद गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून गंगा माऊली शुगर्स केज व उद्योग समूह, लातूरचे चेअरमन लक्ष्मणराव मोरे तर अध्यक्षस्थानी साई शुगर व उद्योग समूह, रांजणी, धाराशिवचे चेअरमन बी.बी.ठोंबरे हे असणार आहेत. तर एमआयटी-एडीटी विद्यापीठ, लोणी काळभोर, पुणे कार्यकारी अध्यक्ष व कुलगुरू प्रा.डॉ.मंगेश कराड यांच्या शुभहस्ते व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सुप्रसिद्ध धृपद गायक उस्ताद अनिसोद्दिन आणि उस्ताद नफिसोद्दिन डागर, जयपूर (राजस्थान) यांना पद्मश्री शंकरबापूजी धृपद गौरव




**सुप्रसिद्ध धृपद गायक उस्ताद अनिसोद्दिन आणि उस्ताद नफिसोद्दिन डागर पुरस्काराचे मानकरी; धृपद गायन जुगलबंदी रंगणार**

पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.नंदकुमार सोमवंशी हे उपस्थित राहाणार आहेत. पुरस्कार वितरण सोहळ्यानंतर सुप्रसिद्ध धृपद गायक उस्ताद अनिसोद्दिन डागर आणि उस्ताद नफिसोद्दिन डागर यांच्या संगीत सभेत धृपद गायन जुगलबंदीची मैफल रंगणार आहे. त्यांना पंडित उद्धवराव बापू आपेगावकर यांची पखावज साथसंगत लाभणार आहे. तरी या कार्यक्रमास अंबाजोगाई शहर व परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक आणि संगीत रसिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन पद्मश्री शंकरबापू आपेगावकर परिवार, अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# आ.धसांनी प्राजक्ता माळीचा विषय संपवला

**बीड । प्रतिनिधी**

अभिनेत्री प्राजक्ता माळी हिच्या विषयी वादग्रस्त वक्तव्य केरणारे





बीडचे भाजपा आमदार सुरेश धस यांनी आज दिलीगिरी व्यक्त केली आहे. अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने पत्रकार परिषद घेत धस यांनी माफी मागावी अशी मागणी केली होती. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन याबाबत दखल घ्यावी अशी विनंतीही केली होती. यामुळे आज आमदार सुरेश धस यांनी माळी यांची माफी मागितली आहे. माझ्या वक्तव्यामुळे कोणाचे मन दुखावले असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो असे धस यांनी म्हटले आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्तेनंतर राज्यातील राजकारण चांगलेच ढवळून निघाले आहे. मंत्री धनंजय मुडे यांच्याशी संबधित असलेले वाल्मिकी कराड यांचा या हत्येत सहभाग असल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणावरुनच आमदार धस यांनी परळी मध्ये कसे इव्हेंट पॉलिटिक्स चालते याचे उदाहरण देताना प्राजक्ता माळी हिचे नाव घेतले होते. दरम्यान प्राजक्ता माळी हिने महिला आयोगाकडेही धाव घेतली आहे. तिने धस यांच्या वक्तव्याविरोधात तक्रार दाखल केली आहे. याची दखल आयोगाने घेतली आहे.

# वार्षिक क्रीडा महोत्सवाचे बक्षीस वितरण




**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

माईर एम आय टी पुणे संचलित कै.दादाराव कराड विद्यालयात झालेल्या वार्षिक क्रीडा महोत्सवाचा बक्षीस वितरण सोहळा नुकताच संपन्न झाला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी रामराजे कराड होते तर, प्रमुख अतिथी म्हणून राजेसाहेब लोमटे, सुग्रीव ताटे, संगप्पा तलेवाड,सागर राऊत संध्या केंद्रे आदी उपस्थित होते.बक्षीस मिळवणे म्हणजे जिंकणे नव्हे तर पूर्वीची एखादी गोष्ट चांगली करणे म्हणजे जिंकणे होय असे मत मान्यवरांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. प्राथमिक व माध्यमिक गटाच्या सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस देण्यात आले

क्रीडा विभाग प्रमुख प्रभाकर घुले यांनी वार्षिक क्रीडा अहवाल सादर केला.प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले पसायदान गायनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी पालक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते



**धर्मापूरी: परळी तालुक्यातील धर्मापुरी येथे वेळ अमावस्येनिमित्त पारंपरिक पूजन मोठ्या उत्साहात व श्रद्धेने पार पडले. शेतकरी वर्गासाठी वेळ अमावस्या हा सण विशेष महत्त्वाचा असून तो शेतीशी संबंधित परंपरा आणि समृद्धीचे प्रतीक मानला जातो. छायाचित्रात शेतकरी श्रीमंत फड कुटुंबीयांसमवेत पारंपरिक पद्धतीने पूजा-अर्चा करताना दिसत आहेत.**

# अनुदानासाठी ७ हजार शेतकऱ्यांनी केवायसी करावी-तहसीलदार चव्हाण

अंबड । प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील पहिल्या टप्प्यातील ७ हजार ४० शेतकऱ्यांना अनुदान खात्यावर जमा करण्यासाठी व्ही के नंबर घेऊन केवायसी करावे करून घ्या यानंतर टप्प्याटप्प्याने सर्व शेतकऱ्यांना अनुदान मिळणार आहे असे आवाहन अंबड तहसीलदार विजय चव्हाण यांच्याकडून शेतकऱ्यांना कळविण्यात येत आहे.अंबड तालुक्यातील नैसर्गिक आपत्ती अंतर्गत झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने बारा गावातील सात हजार चाळीस खातेदार यांच्या याद्या अपलोड करण्यात आलेले आहेत तरी सदर बारा गावच्या शेतकऱ्यांनी केवायसी करून नंबर प्राप्त करून घ्यावे, व्हीके नंबर प्राप्त झाल्या नंतर संबंधित शेतकऱ्याच्या खात्यामध्ये पैसे वर्ग होणार आहे. करिता बारा गावच्या याद्या प्रसिद्ध करण्यात आली आहे . करता संबंधित शेतकऱ्यांनी आपले आधार कार्ड बँक डिटेल्स व इतर माहिती यांची ई केवायसी करून तात्काळ अनुदान उपलब्ध करून घ्यावे. असे आवाहन तहसीलदार



◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# रेल्वे रुळावर सिलेंडर ठेवून घातपाताचा प्रयत्न; अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल

**उरुळी कांचन । प्रतिनिधी**

गॅसने भरलेले सिलेंडर रेल्वेच्या रुळावर ठेवून घातपात घडविण्याचा प्रयत्न झाल्याची घटना उरूळी कांचनच्या हद्दीत रविवारी (ता. २९) रात्री पावणे अकराच्या सुमारास लोको पायलटच्या सतर्कतेमुळे उघडकीस आली. याप्रकणी उरूळी कांचन पोलिसांनी अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

घटनेचे गांभीर्य ओळखून रेल्वे व रेल्वे पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळास भेट देवून तपासाच्या व सुरक्षेच्या दृष्टीने सूचना केल्या. याप्रकरणी रेल्वेचे लोको पायलट शरद शहाजी वाळके, (वय ३८ ) यांनी फिर्याद दिली आहे.

उरूळी कांचन पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोको पायलट शरद वाळके हे नेहमीनुसार रविवारी (ता. २९) रात्री आपल्या हद्दीतील रेल्वे मार्गाची पाहणी करत होते. त्यांना रात्री पावणे अकराच्या सुमारास उरूळी कांचनच्या हद्दीत पुण्याकडे जाणाऱ्या रेल्वे रुळावर (रेल्वे विद्युत पोल किलोमीटर नंबर २१९/७-५) प्रिया गोल्ड कंपनी गॅसचा सिलेंडर आढळला. त्यांनी ते सिलेंडर उचलण्याचा प्रयत्न केला असता, सिलेंडरमध्ये गॅस (३९०० किं ग्रॅम वजन) असल्याचे लक्षात आले. तात्काळ वाळके यांनी ते सिलेंडर रेल्वे रुळापासून दूर नेत अज्ञात व्यक्तीचा घातपात घडविण्याचा कट उधळून लावला.

शरद वाळके यांनी या प्रकाराची माहिती तात्काळ पोलिसांना व वरीष्ठांना दिली. त्यानुसार उरूळी कांचन पोलिसांना रेल्वेच्या कलम १५०, १५२ नुसार अज्ञात व्यक्तीवर घातपाताचा घडवण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, घटनेचे गांभीर्य ओळखून रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी, दौंड विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस, उरुळी कांचन पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शंकर पाटील यांनी घटनास्थळास भेट दिली. अधिक तपास उरूळी कांचन पोलिस करत आहेत.



# नववर्षाच्या पूर्वसंध्येला पुण्यात मोठी कारवाई, तब्बल एक कोटीची बनावट दारु जप्त, ९ जणांना बेड्या

**पुणे । प्रतिनिधी**

नववर्षाच्या पूर्वसंध्येला पुणे विभागात राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून बनावट दारू विरोधात मोठी कारवाई करण्यात आलेली पाहायला मिळत आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने पुण्यातून १ कोटीहून अधिक रुपयांची बनावट दारू जप्त केली आहे. या कारवाई एकूण १६६८ बनावट मद्याच्या बॉटल्स जप्त करण्यात आल्या आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, गोवा राज्यातून बनावट दारू पुणे शहरासह गुजरातमध्ये विक्रीसाठी पाठवण्यात येणार होती. नववर्षाच्या पूर्व संध्येला राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून विविध ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली. या नाकाबंदीत सुमारे १ कोटी २० लाख रुपयांची बनावट दारू जप्त करण्यात आली आहे. या कारवाईत एकूण १६६८ बनावट मद्याच्या बॉटल्स जप्त करण्यात आल्या आहेत. त एकूण ९ जणांना या प्रकरणात अटक करण्यात आली आहे.



नागपूरमध्ये एमडी ड्रग्ज जप्त

तर नागपूर गुन्हे शाखेनं ५० लाखांपेक्षा जास्त किंमतीचं ड्रग्ज केलं जप्त केले आहे. या प्रकरणी सुमित चिंतलवारसह चार आरोपींना अटक करण्यात आली. नागपूर पोलिसांच्या क्राईम ब्रांचच्या एनडीपीएस पथकाने ही कारवाई केली आहे. आरोपींकडून ५५० ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले असून नव वर्षाच्या पार्ट्यांवर नागपूर पोलिसांची बारीक नजर असणार आहे.

तळीरामांवर आवर घालण्यासाठी नाशिक पोलीस सज्ज

दरम्यान, नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर तळीरामांवर आवर घालण्यासाठी नाशिक पोलीस सज्ज झाले आहेत. पोलिसांकडून शहरात ठिकठिकाणी दोन दिवस नाकाबंदी केली जाणार आहे. बेशिस्त चालक, मद्यपींची धरपकड होणार आहे. शहरातील प्रमुख चौक, रिकामे भूखंड आणि मैदानालगत संशयास्पद ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी गस्त वाढवली आहे. नाशिकमध्ये चार उपायुक्त,सात सहाय्यक आयुक्तांसह अधिकारी कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात आहेत. १३ पोलीस ठाण्यांचा बंदोबस्त, तीन गुन्हे शाखा, चार गुन्हे शोध पथक देखील तैनात करण्यात आले आहेत. नाशिक शहरात ५०० पेक्षा अधिक होमगार्ड दंगल नियंत्रण पथक जलद प्रतिसाद पथकही सज्ज असणार आहे. शहरा बाहेरून येणाऱ्या मार्गांवर पोलिसांची विशेष नजर असणार आहे. नियमांचे उल्लंघन करून सेलिब्रेशन करणाऱ्या नाशिककरांवर शहर पोलीस कारवाई करणार आहेत.

# पोलीस कर्मचाऱ्यानी दिली आई, बहिणीला गोळ्या घालण्याची धमकी

**पिंपरी । प्रतिनिधी**

प्रॉपर्टीच्या वादातून एका पोलीस कर्मचार्याने स्वत:च्या आई व बहिणीला अश्लिल शिवीगाळ केली. तसेच त्या दोघींनाही गोळ्या घालण्याची धमकी दिली. ही घटना काळेवाडी येथे शनिवारी (दि. २८) दुपारी पावणे दोन वाजताच्या सुमारास घडली.

याबाबत काळेवाडी येथे राहणा-या ५४ वर्षीय बहिणीने विनयभंगाची फिर्याद दिली आहे. पोलिसांनी ५३ वर्षीय भावाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी पोलीस कर्मचारी आणि त्यांची बहीण यांच्यात आई वडिलांच्या प्रॉपर्टीवरून वाद सुरू आहे. शनिवारी दुपारी पावणेदोन वाजताच्या सुमारास आरोपी पोलीस कर्मचारी आपली पत्नी आणि मुलीसह बहिणीच्या घरी आला.




बहिणीसोबत आईदेखील होती. त्यावेळी भावाने आई आणि बहिणीला शिवीगाळ केली. तसेच आरोपीची पत्नी आणि मुलीनेही त्यांना शिवीगाळ केली. मी पण पोलीस आहे. मी तिला गोळ्या घालतो, काय होईल ते होईल. त्यानंतर पत्नी आणि मुलीला म्हणाला की तुम्ही दोघींनी बहीण आणि आईला मारहाण केली नाही तर मी फास लावून आत्महत्या करेन, अशी धमकी दिली. काळेवाडी पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

# शहरात चार अपघात; दोघांचा मृत्यू, तीनजण जखमी

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

शहरात चिंचवड, निगडी, आळंदी आणि भोसरी येथे चार अपघात झाले. यातील दोन अपघातात दोघांचा मृत्यू झाला. तर, इतर दोन अपघातात तिघेजण जखमी झाले आहेत. याप्रकरणी शनिवारी (दि. २८) संबंधित पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. भरधाव जाणार्या बुलेटने एका दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकी चालक जखमी झाला. हा अपघात शुक्रवारी (दि. २७) सकाळी आठ वाजता मोहननगर चिंचवड येथे घडला. सचिन माणिक डेंगाळे (३६, रा. चिंचवड) यांनी पिंपरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार बुलेट चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वेगात जाणार्या डंपरने डिव्हायडरला धडक दिल्याची घटना शनिवारी (दि. २८) सकाळी अकरा वाजता भक्ती शक्ती उड्डाणपुलावर घडली. यामध्ये डंपर चालक जखमी झाला आहे. डंपर चालक छोटेलाल तायरा रावत (५७, रा. निगडी), मिश्रीलाल फत्तेलाल कोल (२८, रा. निगडी) यांच्या विरोधात निगडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.उसाच्या शेतात काम करणार्या कामगाराचा ट्रकखाली चिरडून मृत्यू झाला. हा अपघात शनिवारी (दि. २८) सकाळी साडेदहा वाजता घडला. बप्पासाहेब विठ्ठल खनाळ (४५, रा. बीड) असे मृत्यू झालेल्या कामगाराचे नाव आहे. याप्रकरणी बप्पासाहेब यांचा मुलगा संदीप खनाळ यांनी आळंदी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार ट्रक चालक महेंद्र पोपट कोळेकर (रा. चाकण) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भोसरी येथून पिंपरी येथे कामावर जाणार्या वृद्ध व्यक्तीच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने भोसरी एमआयडीसी मधील सदिच्छा चौकात धडक दिली. या अपघातात वृद्ध व्यक्तीचा मृत्यू झाला. विठ्ठल गेनू तनपुरे (वय ७२) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी अज्ञात वाहन चालकाच्या विरोधात एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

# ऊसतोड महिलेसाठी डॉक्टर ठरले देवदूत

**पुणे । प्रतिनिधी**

शिरसगाव काटा येथील आशासेविकेची तत्परता आणि मांडवगण फराटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांकडून वेळेत मिळालेल्या वैद्यकीय उपचारांमुळे एका ऊसतोड महिलेची सुखरूप प्रसूती झाली. त्यामुळे या महिलेला डॉक्टरांच्या रूपात देवदूत भेटल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

याबाबत माहिती अशी, शिरसगाव काटा, जगतापवाडी येथे विकास जगताप यांच्या घराजवळ मूळचे छत्रपती संभाजीनगर येथील असलेले कुटुंब ऊस तोडणीसाठी आले आहे. काही दिवसांपासून ते येथे राहात आहेत. या कुटुंबातील ऊसतोड मजूर महिला उज्ज्वला मोरे यांचे प्रसूतीचे दिवस जवळ आल्याने त्यांचे कुटुंबीय काळजीत होते. पहाटे तीनच्या सुमारास उज्ज्वला यांना प्रसवकळा सुरू झाल्या. त्यामुळे कटुंबीयांच्या काळजीत भर पडली. दरम्यान, याबाबतची




माहिती मिळताच गावातील आशासेविका जयश्री गायकवाड यांनी मांडवगण फराटा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकार्यांना माहिती दिली. त्यानुसार वैद्यकीय अधिकार्यांनी तत्काळ रुग्णवाहिका पाठवून उज्ज्वला यांना दवाखान्यात दाखल केले. वेळेत वैद्यकीय उपचार मिळाल्याने त्यांची सुखरूप प्रसूती झाली. दोन दिवसानंतर आईसह नवजात बाळाला घरी सोडण्यात आले. याकामी मांडवगण फराटा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. नितीन फटाले, राजेंद्र काळे, उषा लाड, आशासेविका जयश्री गायकवाड, किरण गायकवाड, आशा कळसकर, जे. आर. बनसोडे, डॉ. जे. के. पावरा, किरण जगताप, विकास जगताप यांनी सहकार्य केले. याबाबत विकास जगताप म्हणाले, मांडवगण फराटा येथील वैद्यकीय पथकाने वेळेत वैद्यकीय मदत केल्याने ऊसतोड मजूर महिलेची सुखरूप प्रसूती झाली. या गरीब कुटुंबाला डॉक्टरांच्या रूपात देवदूत भेटल्याचे त्यांनी सांगितले.

# शहरातील १४ पीआयचा एसीपीच्या प्रमोशन निवड सूचीत समावेश

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात कार्यरत असलेल्या एकूण १४ वरिष्ठ पोलीस निरिक्षकांचा सहाय्यक पोलीस आयुक्त तथा पोलीस उपअधीक्षक पदावरील पदोन्नतीसाठीच्या निवडसूचीत समावेश करण्यात आला आहे. पोलीस महासंचालक कार्यालयाच्या वतीने जाहीर केलेल्या निवडसूचीतील ४६६ पैकी शहरातील १४ वरिष्ठ पोलीस निरिक्षकांचा समावेश करण्यात आला आहे.

राज्याच्या पोलीस महासंचालक कार्यालयाच्या वतीने सन २०२४-२५ या सालामध्ये सहाय्यक पोलीस आयुक्त तथा पोलीस उपअधीक्षक पदावरील पदोन्नतीच्या कार्यकक्षेत विचाराधिन असलेल्या वरिष्ठ पोलीस निरिक्षकांची माहिती मागविण्यात आलेली आहे. राज्यभरातील पोलीस दलातील एकूण ४६६ वरिष्ठ पोलीस निरिक्षकांची निवडसूची तयार करण्यात आली असून, प्रत्येक पोलीस घटकाला संबंधित वरिष्ठ पोलीस निरिक्षकाची विहित नमुन्यातील माहिती वेळेवर सादर करण्याची सूचना करण्यात आले आहे.

या वरिष्ठ पोलीस निरिक्षकांचा निवडसूचीत समावेश आहे

निवृत्ती बाबुराव कोल्हटकर, शंकर रामभाऊ डामसे, जितमद्र वसंतराव कोळी, सतीश विठ्ठलराव नांदुरकर, शैलेश सुधाकर गायकवाड, ज्योती घन:शाम बागुल, प्रसाद शंकर गोकुळे, विश्वजीत वसंत खुले, अंकुश पांडुरंग बांगर, विजय जानकीराम वाघमारे, कन्हैयालाल पन्नालाल थोरात, वसंतराव दादासाहेब बाबर व श्रीराम बळीराम पोळ.

# शेतकरी संघटना आगामी निवडणुका स्वबळावर लढणार-अंबादास हांडे यांची घोषणा

**आळेफाटा । प्रतिनिधी**

विघ्नहर सहकारी कारखान्याच्या सन २४/२५ ऊसाचे गाळप सुरू होऊन ४५ दिवस झाले आहे परंतु कारखान्यांनी पहिली उचल अद्याप दिलेली नसुन ती त्वरीत ३५०० रुपये प्रमाणे द्यावीत तसेच आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व विघ्नहर कारखाना निवडणुका शेतकरी संघटना स्वबाळावर लढणार असल्याचे पुणे जिल्हा शेतकरी संघटनेचे संघटक अंबादास हांडे यांनी वडगाव कांदळी या ठिकाणी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

पुणे जिल्हा शेतकरी संघटनेच्या वतीने वडगाव कांदळी (ता.जुन्नर)या ठिकाणी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.त्या प्रसंगी ते बोलत होते.याप्रसंगी तालुकाध्यक्ष संजय भुजबळ,अजित वाघ,सचिन



थोरवे,प्रमोद खांडगे, डॉ.दत्ता खोमणे,बाळासाहेब काकडे, योगेश तोडकर, अजित वाघ,मनोज शिंदे आदी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी पत्रकारांशी बोलताना हांडे म्हणाले की कांदा निर्यातमुल्य शुन्य टक्के करावा,जागोजागी ट्रान्समार्फरला व नविन कनेक्शन घेणा-या ग्राहकास प्रीपेड मीटर बसविणे,७.५ एच.पी.पासुन पुढील वापर असलेल्या कृषी पंपाचे शेतकऱ्यांचे वीज बिल माफ करावे.विद्यमाण सरकारने निवडणूकीच्या काळात कर्जमाफीची जी घोषणा केली आहे ती अमलात आणावी. तसेच शेतकरी संघटनेच्या वतीने आणे पठार भागातील आणे आनंदवाडी पेमदरा शिंदेवाडी व्हरुंडी नळावणे या भागाला उपसिंचनाद्वारे पाणी मिळावे खामुंडी पिंपरीपेंढार खारावणे नवलेवाडी वडगाव आनंद पादीरवाडी आळे संतवाडी कोळवाडी राजुरी उंचखडक बेल्हे गुंजाळवाडी बेल्हे बांगरवाडी गुळुंचवाडी या गावांचा कुकडी प्रकल्पात समावेश व्हावा कुकडी प्रकल्पात कोल्हापूर पद्धतीचे बंधारे समाविष्ट व्हावेत आदीवासी भागाला वरदान ठरणारे डिंबे माणिकडोह पिंपळगावजोगा धरण क्षेत्रात बुडीत बंधारे त्वरीत झाले पाहिजेत डिंबे कालवा जो मिना शाखा कालव्यास पुरक आहे तो चालू राहिला पाहिजे डिंबा माणिकडोह बोगदा संपूर्ण संचय पाणी पातळीपासून झाला पाहिजे डिंबा माणिकडोह बोगद्याला शेतकरी संघटनेचा विरोध असुन डिंबा धरणाचे पाणी वडज धरणात सोडण्यात यावे. तसेच तालुकाध्यक्ष भुजबळ यांनी माहीती देताना सांगितले की चालुवर्षी जुन्नर तालुक्यात अतीशय कमी पाऊस झालेला असुन शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याचे नियोजन करावे तर तालुक्यात बिबट्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असुन दिवसेंदिवस मणुष्यांवर व पाळीव प्राण्यांवर हल्ले वाढतच चालले असल्याने वनविभागाने याकडे लक्ष देऊन बिबटयांचा बंदोबस्त करावा.

# आमदार सुरेश धस यांनी मागितली माफी

**पुणे । प्रतिनिधी**

अभिनेत्री प्राजक्ता माळी हिच्या विषयी वादग्रस्त वक्तव्य केरणारे बीडचे भाजपा आमदार सुरेश धस यांनी आज दिलीगिरी व्यक्त केली आहे. अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने पत्रकार परिषद घेत धस यांनी माफी मागावी अशी मागणी केली होती. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन याबाबत दखल घ्यावी अशी विनंतीही केली होती. यामुळे आज आमदार सुरेश धस यांनी माळी यांची माफी मागितली आहे. माझ्या वक्तव्यामुळे कोणाचे मन दुखावले असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो असे धस यांनी म्हटले आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्तेनंतर राज्यातील राजकारण चांगलेच ढवळून निघाले आहे. मंत्री धनंजय मुडे यांच्याशी संबधित असलेले वाल्मिकी कराड यांचा या हत्येत सहभाग असल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणावरुनच आमदार धस यांनी परळी मध्ये कसे इव्हेंट पॉलिटिक्स चालते याचे उदाहरण देताना प्राजक्ता माळी हिचे नाव घेतले होते.

दरम्यान प्राजक्ता माळी हिने महिला आयोगाकडेही धाव घेतली आहे. तिने धस यांच्या वक्तव्याविरोधात तक्रार दाखल केली आहे. याची दखल आयोगाने घेतली आहे.

# चित्रकलेच्या प्रसारासह कला साक्षरताही आवश्यक-रामदास फुटाणे

**पुणे । प्रतिनिधी**

चित्रकला ही प्राचीन काळापासून मानवाची संवाद भाषा असून आजच्या मोबाईल युगात कलेचा प्रसार झपाट्याने होताना दिसतो आहे. परंतू कला रसिकांसह सामान्य नागरिकांमध्ये कला साक्षरता होणे सुद्धा गरजेचे असल्याचे मत ज्येष्ठ कवी, कला समिक्षक व सिने दिग्दर्शकरामदास फुटाणे यांनी केले. बालगंधर्व कलादालन पूणे, येथे आयोजित जामखेड येथिल कलाशिक्षक मुकुंद राऊत यांच्या मॉडर्न आर्ट (रलींीरलीं पेटिंग) विषयक चित्र शिल्प प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

ल.ना.होशिंग विद्यालयातील कलाशिक्षक राऊत मुकुंद यांच्या चित्र-शिल्पाचे प्रदर्शन २८ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी पाच वाजता बालगंधर्व कलादालन पुणे या ठिकाणी संपन्न झाले. या प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी ज्येष्ठ साहित्यिक वात्रटिकाकार रामदासजी फुटाणे, पद्मश्री पोपटराव पवारआदर्श ग्राम समिती कार्याध्यक्ष हिवरे बाजार, आंतरराष्ट्रीय चित्रकार शिल्पकार



प्रमोद कांबळे, शिवाजीराव बोडके (खझड) माझी पोलीस महानिरीक्षक, शिक्षणतज्ञ, राष्ट्रपती पारितोषिक विजेते अ.ल.देशमुख, प्राचार्य बाळासाहेब पारखे ल.ना.होशिंग विद्यालय जामखेड, सदानंद होशिंग माजी सुभेदार भारतीय सैन्य, व्यंगचित्रकार लहू काळे पुणे,संजय पठाडे जिल्हाध्यक्ष कला शिक्षक संघटना अ.नगर. सर्व मान्यवरांचे सत्कार व त्यानंतर राऊत मुकुंद यांचे कॅटलॉग पुस्तिकेचे प्रकाशन झाले. यावेळी राजेश मोरे खजिनदार दि पीपल्स एज्युकेशन सोसायटी जामखेड, प्राचार्य रमेश अडसूळ, माझी उपमुख्याध्यापक दादाहरी ठाकरे सर, माझी प्राचार्य हलकुडे, हळपावत, शहाजी वायकर, कलाशिक्षण रघुनाथ हराळे उपमुख्याध्यापक प्रवीण गायकवाड, पर्यवेक्षक दत्तात्रय राजमाने, सिने निर्माते रंजीत गुगळे, ऋषिकेश हुंबे, डॉक्टर पल्लवी वायकर डॉक्टर अश्विनी शेंडे, कलाशिक्षक सरसमकर, गोलेकर, चित्रकार गजानन शेळके, डॉक्टर स्नेहल पाटील, अनेक माझे विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल देडे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉक्टर प्रवीण बनकर यांनी केले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री पोपटराव पवार, आदर्श गाव समिती अध्यअ, महाराष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय कला शिल्पकार प्रमोद कांबळे, याच्यासह अ ल देशमुख, सदानंद होशिंग, बाळासाहेब पारखे, लहू काळे, संजय पठाडे आदी मान्यवर उपस्थित होते, याप्रसंगी, मान्यवरांनी राऊत यांच्या चित्रकला प्रसाराबाबत विशेष कौतुक करत सदिच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकत राऊत यांनी कलाजीवनाचा प्रवास उलगडत ल. ना. होशिंग विदयालय जामखेड यांचे मुख्याध्यापक शिक्षकवृंद व संचालक मंडळ यासह माजी विद्यार्थी याचे आभार मानले याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या साक्षीने राऊत यांचे आईवडील घनश्याम व सी.शांताबाई राऊत यांचा मान्यवरांच्या शुभहस्तते नागरी सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल देडे मराठी विभाग प्रमुख आणि आभार प्रदर्शन डॉ प्रवीण बनकर यांनी केले.

# पुस्तकांच्या सहवासात राहणारे कायम उच्च स्थान मिळवतात - कृष्णकुमार गोयल

**पुणे । प्रतिनिधी**

वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत सोमवार दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते ग्रंथालय स्वच्छता अभियान राबविण्यात आले प्रथमतः ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस आर रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी माजी विद्यार्थी प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांनी ग्रंथालयातील ३४००० अधिक ग्रंथांचा तसेच २७ नियतकालिके आणि ग्रंथालयांची स्वच्छता व सर्वेक्षण केले.

अध्यक्षस्थानी खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष



कृष्णकुमार गोयल यांनी वाचकांशी संवाद साधताना आपले मनोगत व्यक्त केले यामध्ये त्यांनी जे वाचक पुस्तकांच्या सहवासात राहणारे असतात ते कायम उच्च स्थान मिळवतात असे प्रतिपादन केले तसेच १ जानेवारी २०२५ ते १५ जानेवारी २०२५ या पंधरवड्यात अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे असे सांगण्यात आले. या उपक्रमानिमित्त खडकी शिक्षण संस्थेचे सचिव आनंदी छाजेड रमेश अवस्थे राजेंद्र भूतडा प्राचार्य डॉ.संजय चाकणे डॉ.गजानन आहेर प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल आनंद नाईक यांनी केले व तर आभार प्रदर्शन डॉ शैलेंद्र काळे यांनी केले